K L THAKUR
AND SONS SARAF
Since 1928
Gold | Silver | Diamond
3209, Bagwanpur, Kamod Road, Nasik-422001
0253-2505488 | 2504258

नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक
किंमत २
# भ्रमर
BHRAMAR

Physioflex
Working towards healthy lifestyle
Physiotherapy Clinic & Fitness Studio
Dr. Moinuddin Farooque (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.P.T.)
9021756646 8329099901
Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid, Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
Shivraya Multi Speciality Hospital, DGP Nagar 2, Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik

वर्ष ५३ वे, अंक २६४
Year : 53, Issue No. : 264
नाशिक, सोमवार दि. ९ मार्च २०२६
Nashik, Monday 9 March 2026
R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026
पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2

## पुण्याच्या तिघांनी केली नाशिकच्या व्यापाऱ्याची तेरा लाखांची फसवणूक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- कच्च्या चांदीची ऑर्डर देऊन त्या बदल्यात तेरा लाख रुपये घेऊनही कच्ची चांदी न पाठविता व्यापाऱ्याची आर्थिक फसवणूक करणाऱ्या पुण्याच्या तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी प्रकाश बच्चूभाई तांबट (रा. देवधर लेन, रविवार पेठ, नाशिक) हे चांदीचे व्यापारी आहेत. त्यांनी बी बी कॉर्पोरेशन या चांदीच्या दुकानासाठी चार किलो कच्च्या चांदीची ऑर्डर पुणे येथील नवकार ज्वेलर्सचे प्रोप्रायटरी मालक नेमिचंद कोरीमुथ्था, प्रणव कोरीमुथ्था व अमन कोरीमुथ्था (तिघेही रा. धनवर्षा मार्केट, रविवार पेठ, पुणे) यांना दिली व त्यासाठी फिर्यादी तांबट यांनी कोरीमुथ्था यांना वेळोवेळी १३ लाख ४ हजार रुपये आरटीजीएसद्वारे ऑनलाईन पद्धतीने दिले; मात्र या तीनही आरोपींनी संगनमत करून फिर्यादीकडून ऑनलाईन पैसे स्वीकारूनही कच्ची चांदी न पाठविता १३ लाख ४ हजार रुपयांची फसवणूक केली. हा प्रकार दि. २३ जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घडला. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक डगळे करीत आहेत.

## डॉक्टरकडून महिलेचा विनयभंग

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** ड्युटी आटोपून घरी जाताना महिलेचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याची घटना कुलकर्णी गार्डनजवळ घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी, की आरोपी डॉ. गिरीश अरुण कंदलकर (वय ४१, रा. विंचूर रोड, येवला) हे व पीडित महिला एकाच ठिकाणी काम करतात. त्यांच्यामध्ये जुने वाद होते. दि. ८ मार्च रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास पीडिता या ड्युटी आटोपून घरी जात असताना डॉ. गिरीश कंदलकर याने त्यांचा छुपा पाठलाग करून त्यांना कुलकर्णी गार्डनजवळ अडवले. जुन्या वादाची कुरापत काढून ''मी तुला पाहून घेतो,'' अशी दमदाटी त्याने केली. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार गांगुर्डे करीत आहेत.

## सातपूरला कंपनीतून स्पेअरपार्टची चोरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** कंपनीत असलेले ७० हजार रुपये किमतीचे कॉपरचे स्पेअरपार्ट असलेले पाच बॉक्स अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना सातपूर एमआयडीसीत घडली.


याबाबत दुष्यंत शरदचंद्र जाधव (रा. काठे गल्ली, द्वारका) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले, की सातपूर एमआयडीसीतील शार्प फासनर ॲण्ड इंजिनिअरिंग कंपनीत ७० हजार रुपये किमतीचे कॉपरचे स्पेअर पार्ट असलेले खाकी रंगाचे पाच बॉक्स होते. हे बॉक्स अज्ञात चोरट्याने दि. ८ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास संशयित अजय तुकाराम घुले (रा. संतोषी मातानगर, सातपूर एमआयडीसी) याने चोरून नेले. या प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार खरपडे करीत आहेत.

# लोकसभा अध्यक्ष ओम बिर्लांविरोधात आज विरोधकांकडून अविश्वास प्रस्ताव

**नवी दिल्ली (भ्रमर वृत्तसेवा) :- लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात विरोधकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. त्यावर आज चर्चा होणार आहे.**

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून सुरु होत आहे. अधिवेशनाचा उत्तरार्ध वादळी होण्याची शक्यता आहे. लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव, पश्चिम आशियातील युद्ध, इराणबद्दल सकारची भूमिका, रशियाकडून तेल खरेदी, पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरावलोकन या मुद्यांवरून संसदेतील वातावरण तापण्याची शक्यता आहे. दरम्यान, सदनात उपस्थित राहण्यासाठी भाजप, कॉंग्रेस यांनी आपल्या खासदारांना व्हीप बजावला आहे.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पदावरून हटवण्यासाठी विरोधकांकडून प्रस्ताव मांडला जाणार आहे. लोकसभा अध्यक्षांविरोधात अविश्वास ठराव मंजूर करायचा असेल तर कमीत कमी ५० सदस्यांचा पाठिंबा लागतो. अविश्वास प्रस्ताव स्वीकारल्यानंतर त्यावर चर्चा करून



मतदान केले जात. पण ५० सदस्यांनी पाठिंबा दिला नाही तर प्रस्ताव अमान्य केला जातो. त्यामुळेच सत्ताधारी आणि विरोधकांकडून आपल्या खासदारांना व्हीप जारी केला आहे.

मोहम्मद जावेद, के. सुरेश आणि मल्लू रवी या कॉंग्रेस सदस्यांकडून लोकसभेत सूचना मांडली जाईल. अध्यक्षांचे सभागृहातील वर्तन, विरोधकांना बोलू न देणे, महिला खासदारांवर आरोप. या कारणांमुळे विरोधकांकडून अविश्वास प्रस्ताव मांडला जात आहे. माजी पंतप्रधानांविरुद्ध पूर्णपणे आक्षेपार्ह आणि अपमानास्पद टिप्पणी करणाऱ्या सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना अक्ष्यक्षांनी फटकारले नाही, असा आरोपही कॉंग्रेसने केला. ओम बिर्ला सर्व वादग्रस्त मुद्यांवर सत्ताधारी पक्षाचे उघडपणे समर्थन करतात आणि त्यांच्या या सर्व कृती सभागृहाच्या कामकाजासाठी अयोग्य आहेत, असा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळेच त्यांना त्यांच्या पदावरून काढून टाकण्याचा प्रस्ताव विरोधकांकडून आज मांडला जाणार आहे.

या प्रकरणादरम्यान ओम बिर्ला यांना सभागृहात उपस्थित राहण्याची परवानगी संविधानाने दिली आहे. ते स्वतःचा बचाव करू शकतात आणि प्रस्तावावर मतदान करू शकतात. पण प्रकरणावर चर्चा सुरू असताना ते कामकाजाचे अध्यक्षपद भूषवू शकत नाहीत. इतर सदस्यांप्रमाणे ओम बिर्ला यांच्याकडे प्रभाग क्रमांक नाही. त्यामुळे जर प्रस्ताव मतदानासाठी आला तर ते स्वयंचलित मतदान प्रणाली वापरू शकणार नाहीत. त्यांना त्यांचे मत नोंदवण्यासाठी स्लिप वापरावी लागेल. आकडे सरकारच्या बाजूने आहेत, त्यामुळे हा अविश्वास ठराव पराभूत होऊ शकतो हे जवळजवळ निश्चित आहे.

## महिला डॉक्टरच्या आत्महत्येप्रकरणी पतीविरुद्ध गुन्हा दाखल

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** नाशिकमधील प्रसिद्ध आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. मनीषा जेजुरकर यांनी केलेल्या आत्महत्येप्रकरणी पती नीलेश दत्तात्रय जेजुरकर (वय ४६) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी, की दि. ६ मार्च रोजी डॉ. मनीषा जेजुरकर यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. पतीमुळे डॉ. मनीषा यांनी आत्महत्या केल्याचा आरोप त्यांच्या माहेरच्यांनी केला होता. या प्रकरणी रोहिणी वैभव थोरात (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की दि. ६ मार्च रोजी त्यांची बहीण मनीषा हिने आत्महत्या केली असून, ती बेशुद्ध असल्याची माहिती त्यांना मिळाली होती. त्या त्वरित बहिणीच्या घरी दाखल होत त्यांनी, भाऊ गौरव आणि पती नीलेश यांनी तिला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. तेथे डॉक्टरांनी तपासून डॉ. मनीषा जेजुरकर यांना मयत घोषित केले. फिर्यादी रोहिणी थोरात यांनी आरोप केला आहे, की मनीषा या जेलरोड येथून गंगापूर रोड येथे सन २०२१ पासून राहण्यास आल्या होत्या. तेव्हापासून पती नीलेश हा जिल्हा शासकीय रुग्णालयातील एका डॉक्टरसोबत जवळीक साधून तिला घरातील सर्व बारीकसारीक गोष्टी सांगत होता. ती म्हणेल तसा तो घरात वागून मनीषाकडे दुर्लक्ष करून तिला मानसिक त्रास देत होता. नीलेशच्या या वागणुकीमुळे डॉ. मनीषा या मानसिकदृष्ट्या खचल्या होत्या. नीलेशने डॉ. मनीषा यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले, असे त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी पती नीलेश जेजुरकर याच्याविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अहिरराव करीत आहेत.

## माहेरून दोन कोटी रुपये आणत नसल्याने विवाहितेचा छळ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** माहेरून दोन कोटी रुपये आणावेत म्हणून विवाहितेचा १५ वर्षांपासून छळ सुरू असल्याप्रकरणी तक्रार इंदिरानगर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पीडितेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की सन २०११ मध्ये इंदिरानगरमधील युवकासोबत तिचा विवाह झाला होता. ती सासरी नांदत असताना पती, सासू, सासरे, चुलतसासू, चुलतसासरे, दीर व दोन नणंदा हे सर्व जण घरगुती कारणावरून कुरापत काढून पीडितेला वेळोवेळी मारहाण करून शिवीगाळ करीत होते. तिने माहेरून दोन कोटी रुपये आणावेत म्हणून सासरच्या सर्वांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ सुरू केला. पीडित विवाहितेला लग्नात मिळालेले स्त्रीधनदेखील सासरच्यांनी ठेवून घेत त्याचा अपहार केला. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी करीत आहेत.

## शहरातून एका रिक्षासह दोन बुलेटची चोरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** शहर परिसरात वाहनचोरीचे सत्र सुरू असून, वेगवेगळ्या घटनांमध्ये एका रिक्षासह दोन बुलेट चोरून नेल्याच्या घटना घडल्या.

वाहनचोरीचा पहिला प्रकार सिडकोत घडला. फिर्यादी नवनीत हिरामण चौधरी (रा. त्रिमूर्ती चौक, शिवशक्तीनगर, सिडको) यांनी राहत्या घराच्या बाजूला मोकळ्या जागेत नीळकंठेश्वर महादेव मंदिराजवळ एमएच १५ एफयू ४२९९ या क्रमांकाची ३५ हजार रुपये किमतीची बजाज कंपनीची रिक्षा उभी केली होती. ही रिक्षा अज्ञात चोरट्याने मध्यरात्रीच्या सुमारास चोरून नेली. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात रिक्षाचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार महाजन करीत आहेत.

वाहनचोरीचा दुसरा प्रकार बोधलेनगर येथे घडला. फिर्यादी चेतन दौलतराम आमेसर (रा. नवीन कलानगर, जेलरोड) यांनी एमएच १५ एचझेड ६१६१ या क्रमांकाची ९० हजार रुपये किमतीची रॉयल एनफिल्ड बुलेट बोधलेनगर येथे आयसीआयसीआय बँकेच्या पार्किंगमध्ये उभी केली होती. ही बुलेट अज्ञात चोरट्याने मध्यरात्री सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान लबाडीच्या इराद्याने चोरून नेली.

या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार डंबाळे करीत आहेत.

वाहनचोरीचा तिसरा प्रकार इंदिरानगर येथे घडला. फिर्यादी कुणाल कांतीलाल चव्हाण (रा. अत्रीपूजन सोसायटी, परबनगर, इंदिरानगर) यांनी राहत्या सोसायटीच्या पार्किंगमध्ये एमएच १५ एचएस ७४४४ या क्रमांकाची ६० हजार रुपये किमतीची रॉयल एनफिल्ड बुलेट पार्क केली होती. ही बुलेट सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार गारले करीत आहेत.

# रहाड संस्कृती जपत नाशिककरांनी साजरा केला रंगोत्सव

## शॉवरखाली डीजेच्या तालावर नाचत आबालवृद्धांनी घेतला आनंद





**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** होळी सणानंतर पाचव्या दिवशी रंग खेळण्याची नाशिकची परंपरा असून काल झालेल्या रंगपंचमीमध्ये एकमेकांना रंग लावला. भारतात नाशिक मध्येच असलेल्या राहड संस्कृती अंतर्गत वेगवेगळ्या रंगात डुबत तरुण-तरुणींसह अबालवृद्धांनी रंगपंचमीचा मनमुराद आनंद लुटला.

नाशिकच्या रंगपंचमीला तेही जुन्या नाशकामध्ये विशेष महत्त्व आणि पारंपारिकता आहे. जुन्या नाशकात यंदा आठऱ्हाडींमध्ये येथील जुनी संस्कृती व परंपरा जपत त्या रंगांमध्ये न्हाऊन निघण्यासाठी सारे डुबक्या मारण्यासाठी उत्सुक होते.

गेल्या सोमवारी होळी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. त्याच्या दुसऱ्या दिवशी वीर नाचवण्याची परंपरा देखील नाशिकमध्येच आहे. ही परंपरा जपत वीर मिरवणूक नाशिकमध्ये देखील यंदाचे वेगळेपण जपणारीच झाली. त्यानंतर सर्व नाशिककरांचे लक्ष काल झालेल्या रंगपंचमीकडे होते. त्याकरिता जुन्या नाशकातील तिवंधा चौक येथे पिवळा रंग, मधली होळी येथे गुलाबी रंग, जुनी तांबट लेन येथे केशरी रंग, साती आसरा देवीजवळील राहडीत लाल रंग, राजेबहाद्द लेन येथे केशरी रंग, दंडे हनुमान व पंचवटीतील शनी चौक या दोन्ही ठिकारी गुलाबी रंग याप्रमाणे पारंपरिक रंग पद्धत जपत रहाड खोदण्यापूर्वी व त्यानंतर विधिवत पूजन करून या रहाड्यांमध्ये रंग तयार करण्याचे काम करण्यात आले. त्याकरिता मंडळांचे कार्यकर्ते गेल्या महिन्याभरापासून कार्यरत होते.

या रहाट संस्कृतीबरोबरच यंदा शॉवर खाली डीजेच्या तालावर बेधुंद होऊन नाचण्यासाठी बालकांसह तरुण-तरुणी, अबालवृद्धांचा मोठा सहभाग होता. शिवाजी रोड येथे त्याचबरोबर मेनरोड, संत गाडगे महाराज चौक, कानडे मारुती लेन, भद्रकालीरोड येथील साक्षी गणेश चौकात, सोमवार पेठ, रोकडोबा पटांगण, ठाकरे रोड, तांबट लेन आदी ठिकाणी मागील वर्षापेक्षा मोठ्या प्रमाणात पाण्याचे शॉवर लावण्यात आल्याने या रंगपंचमीचा तरुण-तरुणींनी मोठ्या प्रमाणात आनंद घेतला. गतवर्षीच्या तुलनेत यंदा मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

रंगपंचमीच्या सकाळी बालगोपाल यांनी आपल्या घरात, कॉलनीत, गल्लीत, चौका-चौकात एकत्र येत रंगपंचमी साजरी केली. त्यानंतर दुपारी तरुण-तरुणींनी या रंगपंचमीचा आनंद लुटला तर दुपार-नंतर शॉवर खाली नाचण्यांमध्ये व रहाडीमध्ये उड्या मारण्यासाठी तरुण-तरुणी मोठ्या संख्येने घराबाहेर पडल्यामुळे या सर्व भागांमध्ये अधिकच गर्दी झाली होती.

यावर्षी मेनरोड लगत राजेबहाद्दर लेन येथे पेशवेकालीन रहाड नव्याने आढळल्याने तेथील मंडळांनी विधिवत पूजन करून या रहाडीचा शुभारंभ यंदाचा रंगपंचमीसाठी केला. ही नवीन रहाड बघण्यासाठी नाशिककरांनी तोबा गर्दी केली होती.

शॉवर खाली नाचत राहड्यांमध्ये उड्या मारत असताना होणारी गर्दी लक्षात घेऊन मंडळाच्या पदाधिकाऱ्यांप्रमाणेच पोलीस कुमक, होमगार्डच्या मदतीने मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात करत परिस्थितीवर लक्ष केंद्रित करण्यात येत होते. सायंकाळी रंगपंचमी अधिक उत्साहात येऊ लागली होती, आणि गर्दी वाढू लागल्याने पोलिसांचाही बंदोबस्त वाढविण्यात आला होता. मात्र पाच वाजता पोलिसांनी सर्व शॉवर बंद करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे रहाड्यांमध्ये उड्या मारण्यासही मज्जाव करण्यात आला.

डीजे आणि शॉवर बंद करून पोलिसांनी राहडीत उड्या मारण्यासाठी आलेल्या युवक-युवतींना मज्जाव केला. त्यामुळे काही ठिकाणी पोलीस व तरुणांमध्ये वादाचे प्रसंग घडले. उत्साहात असलेले तरुण ऐकत नसल्यामुळे अखेर सर्व राहड्यांच्या सभोवताली बॅरिकेट्स लावून मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना रहाडीतील रंग तातडीने काढण्यास सांगण्यात आले.

त्यानंतर रंगपंचमी खेळण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या अबाल-वृद्धांसह तरुण-तरुणींनी फेरफटका मारत घरी जाणे पसंत केले. मात्र गर्दी फारशी कमी होत नसल्याने बंदोबस्तही उशिरापर्यंत ठेवण्यात आला होता. रंगपंचमी खेळताना किरकोळ बचावाची, काही युवकांमध्ये किरकोळ कारणांवरून हाणामाऱ्या झाल्या. याव्यतिरिक्त रंगपंचमीचे कार्यक्रम उत्साहात व शांततेत पार पडल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

दिवसभराची रंगपंचमी संपल्यानंतर रस्त्यावर टोप्या, शर्ट पॅन्ट आदी कपडे, दुप्पटे, चपला, बूट, गॉगल, चष्मे, पाण्याच्या बाटल्या, रंगांच्या प्लास्टिक पिशव्या, पिचकाऱ्या अस्ताव्यस्त पडल्या होत्या. त्याचबरोबर शहरातील संपूर्ण रस्ते रंगीबेरंगी झाल्याचे दृश्य सर्वत्र दिसत होते.

## येवल्यात ऐतिहासिक रंगांचे सामन उत्साहात

### शंभर वर्षांची परंपरा युवा वर्गाने जोपासली

**येवला (भ्रमर वार्ताहर) :-** नाशिक जिल्ह्यात होळीनंतर पाचव्या दिवशी साजरी होणारी रंगपंचमी म्हणजे उत्साहाचा सोहळा. पैठणीची नगरी असलेल्या येवला शहरात यंदाही शंभर वर्षांची गौरवशाली परंपरा जपत रंगांचे सामने मोठ्या थाटात पार पडले. वाद्यांचा गजर, गुलालाची उधळण आणि तरुणाईचा अफाट जल्लोष अशा वातावरणात अवघे शहर रंगांत न्हाऊन निघाले होते.

सकाळपासूनच बच्चे कंपनी एकमेकांना रंग लावीत बाटली, पिचकारी आणि डब्यांमध्ये रंगाचे पाणी भरून एकमेकावर रंगाचे पाणी फेकत होते. यात मुली आणि महिला मागे नव्हत्या. गल्ली बोळात व परिसरात मुली आणि महिलांनीही एकमेकांना रंग लावीत आनंद लुटला.

शहरातील ऐतिहासिक टिळक मैदानावर या सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. विविध तालीम संघांच्या कार्यकर्त्यांनी ट्रॅक्टरमध्ये रंगांचे मोठे ड्रम भरून आणले होते. मान्यवरांच्या उपस्थितीत या खेळाला सुरुवात झाली.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी ट्रॅक्टर मार्गस्थ होत असताना, एकमेकांवर होणारा रंगांचा मारा, विविध रंगांचे सामने जणू काही सप्तरंगी इंद्रधनुष्यासारखे दिसत असल्याने प्रेक्षकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरला.

टिळक मैदानानंतर हे सामने डी जे रोड परिसरात रंगले. अनोखे सामने पाहण्यासाठी स्थानिक नागरिकांसह बाहेरगावच्या पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. बदलत्या काळातही येवल्याच्या युवा वर्गाने ही जुनी परंपरा तितक्याच जिद्दीने आणि एकोप्याने टिकवून ठेवल्याचे चित्र पाहायला मिळाले.

रंगांच्या सामन्यांची सुरुवात आझाद चौक व डीजे रोड येथे ट्रॅक्टरसमोर कुणाल फाऊंडेशनचे अध्यक्ष कुणाल दराडे यांच्या हस्ते नारळ वाढून सुरुवात करण्यात आले. डीजेच्या टालावर रंगप्रेमी रंगात भिजून नाचण्याचा आनंद घेत होते.

या ठिकाणचे नियोजन युवा नेतृत्व अविनाश कुक्कर यांनी केले होते. याप्रसंगी संजय कुक्कर, अविनाश कुक्कर, प्रभाकर झळके, शिवसेनेतर्फे यांचा सत्कार करण्यात आला.

शिवसेनेचे गटनेते शिंदे, माजी नगराध्यक्ष बंडू क्षीरसागर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमोल शिंदे, रोहित जावळे, सागर शिंदे शहरप्रमुख विशाल परदेशी, प्रशांत शिंदे, बंटी कुक्कर आदी पदाधिकारी आणि रंग प्रेमी मोठ्या प्राणावर उपस्थित होते.

यादरम्यान पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. शहरात रंगपंचमीचा उत्साह शिगेला पोहोचला असतानाच, सायंकाळी परंपरेनुसार सटवाई आणि वेताळाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. रंगांचे सामने खेळून झाल्यानंतर सायंकाळच्या सुमारास ही मिरवणूक निघते, जी पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावर्षी शहरातील सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाजाचे अविनाश क्षत्रिय यांनी वेताळाची वेशभूषा परिधान केली होती. अंगाला भस्म फासलेले, हातात शस्त्र आणि वेताळाचे रौद्र रूप धारण केलेले रूप मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले.

'सटवाई माता की जय' च्या जयघोषात आणि वाद्यांच्या गजरात ही मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली.

येवला शहराला ऐतिहासिक वारसा असून, ही मिरवणूक गेल्या अनेक पिढ्यांपासून अविरतपणे सुरू आहे. सटवाई आणि वेताळाची ही मिरवणूक म्हणजे केवळ एक उत्सव नसून, ती शहराची सांस्कृतिक ओळख बनली आहे. समाजातील सर्व स्तरांतील नागरिक या सोहळ्यात सहभागी होऊन परंपरेचा आनंद लुटतात. रंगांच्या या उत्सवाची सांगता या भक्तिमय आणि पारंपरिक मिरवणुकीने करण्यात आली.

## 'म्हाडा'च्या सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील घोटाळा उघडकीस

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** 'म्हाडा' मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेत मोठ्या स्वरूपातील घोटाळा नाशिकमध्ये उघडकीस आला असून ४९ जमीन मालकांसह विकासकांवर सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

योजनेद्वारे परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून देण्याचा शासनाचा उद्देश विकासकांनी गुंडाळून ठेवून खऱ्या लाभार्थ्यांना वंचित ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

भूमीअभिलेख कार्यालयाच्या बनावट सही व शिक्क्यांचा वापर करून खोटे मोजणी नकाशे व आकारफोड पत्रके (फॉर्म क्रमांक १२) तयार करण्यात आली. भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी बिपीन काजळे यांनी फिर्याद दिली. महाराष्ट्र शासनाने २०१३ मध्ये जाहीर केलेल्या सर्वसमावेशक गृहनिर्माण धोरणानुसार ४००० चौ. मी. पेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या जमिनीवर बांधकाम प्रकल्प राबविताना २० टक्के क्षेत्र आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (इडब्ल्यूएस) व अल्प उत्पन्न गट (एलआयसी) यांच्यासाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे; परंतु या प्रकरणात शासनाची फसवणूक केल्याची फिर्याद दाखल आहे. फसवणूक केलेल्या विकासकांची नावे पोलीस डायरीत नोंद नाही.

मनपा हद्दीतील म्हसरूळ, विहितगाव, वडनेर दुमाला, देवळाली, आगरटाकळी, आडगाव, नाशिक शहर परिसर, नांदूर (दसक), पंचक, गंगापूर आणि चेहेडी या गावांमधील अनेक सर्व्हे क्रमांकाच्या भूखंडांवर गृहनिर्माण योजना राबविताना शासकीय नियम पायदळी तुडविण्यात आले आहे.२० टक्के राखीवचे नियम पायदळी तक्रारीनुसार, ८ नोव्हेंबर २०१३ नंतर प्रत्यक्षात जमिनीचे विभाजन झालेले नसताना, तसेच अधिकृत मोजणी न करता ही कागदपत्रे खरी असल्याचा आभास निर्माण करून ती तहसील कार्यालयात सादर करण्यात आली. त्यानंतर ४००० चौ. मी. पेक्षा कमी क्षेत्राचे कृत्रिम तुकडे करून सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेसाठी आवश्यक असलेले २० टक्के क्षेत्र राखीव ठेवण्याची अट टाळण्यात आली.

या प्रकारामुळे म्हाडा, महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग, तसेच महाराष्ट्र शासनाची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. जमीन मालक, विकासक आणि त्यांच्या अज्ञात सहकाऱ्यांवर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.




### राशीभविष्य


- **मेष** : प्रवास सुखकर होईल. लोकांचा तुमच्यावरील विश्वास वाढेल. स्वास्थ्य लाभेल.
- **वृषभ** : आरोग्याच्या जुन्या तक्रारी वाढतील. आर्थिक गुंतवणूक योग्य पद्धतीने करा. प्रवास टाळा.
- **मिथुन** : भेटीगाठीत अनुकूलता राहील. प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. आनंदी रहाल. वाहनसौख्य.
- **कर्क** : अनपेक्षित धनलाभ झाल्यामुळे समाधान वाढेल. द्विधा मनस्थिती सुधारेल. विचार ठाम ठेवा.
- **सिंह** : भावंडांचं सहकार्य लाभेल. महत्त्वाचे निर्णय विचाराने घ्यावे. स्थावर प्रश्न सुटतील.
- **कन्या** : व्यवसायात चांगली प्रगती होईल. अनावश्यक खर्च टाळा. नव्या कामांना गती मिळेल. नेतृत्व करा.
- **तूळ** : कार्यक्रमात बदल होतील. अपेक्षित घटना घडतील. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.
- **वृश्चिक** : व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध होईल. योग्य व्यक्तींचं मार्गदर्शन लाभेल. अडचणी दूर होतील.
- **धनु** : व्यवसायात फायदा होईल. नशिबाची चांगली साथ लाभेल. समाजातील प्रतिष्ठा उंचावेल.
- **मकर** : शैक्षणिक क्षेत्रात प्रगती होईल. कलागुणांना चांगल्या संधी लाभतील. स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : नोकरीनिमित्त प्रवास घडेल. व्यवसायात स्थिरता लाभेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.
- **मीन** : जनसंपर्कातून फायदा होईल. नवे प्रकल्प राबवा. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत यश मिळेल.

### ९ मार्च — दिनविशेष

- २०१३ : पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती दर्ग्याला भेट दिली.
- २०१४ : 'मनसे'ने आगामी लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला.
- २०१६ : प्रचंड रकमेचा घोटाळा करणारे विजय मल्ल्या देश सोडून गेल्याची माहिती सरकारने उच्च न्यायालयात दिली.
- २०१८ : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. पतंगराव कदम यांचं निधन.

### ज्ञान-विज्ञान — 'स्पेस बेबीज' ची तयारी

१९६१ मध्ये मानव पहिल्यांदा अंतराळात गेला. तेव्हापासून प्रत्येकाच्या मनात प्रश्न आहे की, मुले अंतराळात जन्माला येतात का? जगभरातील शास्त्रज्ञांना ६२ वर्षांनंतरही हे गूढ उकलू शकलेले नाहीत. तथापि, ब्रिटन आणि नेदरलँडचे शास्त्रज्ञ लवकरच या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतात. 'आयव्हीएफ' उपचाराने अंतराळात मुले जन्माला येतील.



ब्रिटिश शास्त्रज्ञ डच कंपनी 'स्पेसबॉर्न युनायटेड'च्या सहकार्याने 'असिस्टेड रिप्रोडक्शन टेक्नॉलॉजी इन स्पेस' (एआरटीआयएस) मॉड्यूल बनवत आहेत. या अंतर्गत अंतराळात जैव उपग्रह पाठवण्यात येणार आहे. याच्या आत 'इन-व्हिट्रो फर्टिलायझेशन' (आयव्हीएफ) उपचाराद्वारे गर्भाचा जन्म होईल. ते पृथ्वीवर आणून स्त्रीच्या गर्भात हस्तांतरित केले जाईल. पृथ्वीवर जन्माला आलेल्या या मुलांना 'स्पेस बेबीज' म्हटले जाईल. 'स्पेसबॉर्न 'चे संस्थापक डॉ. एगबर्ट एडेलब्रोक म्हणतात, की या प्रकल्पाचा अंतिम उद्देश पृथ्वीच्या बाहेर नैसर्गिकरित्या मुले निर्माण करणे हा आहे; मात्र त्याआधी अवकाशात सध्याच्या तंत्रज्ञानाची चाचणी घ्यायची आहे. यानंतरच अंतराळात सेक्स, गर्भधारणा आणि प्रसूतीवर लक्ष केंद्रित केले जाईल. या प्रकल्पासाठी पहिला प्रयोग उंदरांवर केला जाणार आहे. त्यांचे शुक्राणू आणि अंडी अंतराळात फलित होतील. मॉड्यूलच्या तंत्रज्ञानाची चाचणी घेणारे पहिले उड्डाण एप्रिलमध्ये कॅनडातून उड्डाण करेल.

### स्मार्ट टिप्स — स्मार्टफोन हरवला तर...

* तुमचं जीमेल खातं ज्या स्मार्टफोन्समध्ये लॉग इन करण्यात आलं असेल त्याची यादी इथे दिसेल.

* या यादीतून लॉक पासवर्ड विसरलेल्या स्मार्टफोनची निवड करा. इथे तुम्हाला लॉक युवर फोनचा पर्याय मिळेल. त्यावर क्लिक केल्यावर नविन पासवर्ड किंवा पिन क्रमांक नोंदवावा लागेल. यामुळे तुमचा फोन आपोआप लॉक होईल. दुसरं कोणी तो ओपन करू शकणार नाही.

* इथून फोनच्या जी मेल खात्यातून तुम्ही लॉग आउट करू शकता तसंच फोनमधला डाटाही डिलिट करता येईल.

* फोनमधल्या डाटाचा गुगल ड्राईव्ह किंवा इतर ठिकाणी बॅक अप घेऊन ठेवा. स्मार्टफोन व्यतिरिक्तही दुसऱ्या ठिकाणी महत्त्वाची माहिती सेव्ह करून ठेवायला हवी.

### सौंदर्यसाधना — केस चमकदार होण्यासाठी...

म्हणूनच वरचेवर वाफ दिल्याने त्वचा स्वच्छ होईल आणि जास्त शँपू लावावा लागणार नाही. मात्र शँपूनंतर केसांना कंडिशनर लावा. यामुळे उघडलेली छिद्रं बंद होतील आणि त्यात धूळ जाणार नाही.

वाफ दिल्यामुळे केस चमकदार आणि मुलायम होतात. कोरड्या, निस्तेज केसांची कोणतीही स्टाईल करता येत नाही. पण वाफ दिल्यानंतर केसांमध्ये आर्द्रता टिकून रहात असल्याने तुम्ही केसांची हवी ती स्टाईल करू शकता.

केसांना वाफ देण्यासाठी पार्लरमध्ये स्टीमरचा वापर केला जातो. तुम्ही घरच्या घरीही वाफ देऊ शकता. यासाठी पाणी गरम करून घ्या. त्यात स्वच्छ टर्किश टॉवेल दोन मिनिटं बुडवून ठेवा. तो बाहेर काढा. टॉवेलमधलं पाणी त्याच भांड्यात निथळू द्या. पाणी निथळल्यानंतर टॉवेल डोक्यावर बांधून घ्या. यामुळे केसांना वाफ मिळेल. ही प्रक्रिया आठवड्यातून एकदा करा. नियमित वाफ दिल्याने तुमचे केस छान चमकादार होतील.

### पंचांग

**सोमवार, ९ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, फाल्गुन कृ. ६, चंद्रराशी : तूळ, नक्षत्र : विशाखा, योग : व्याघात, सूर्योदय ६.५४, सूर्यास्त ६.४५

### फॉरवर्ड्स

**मतलब क़ी हद क़्या पूछते हो साहब...**

**यहाँ फूलों क़ो भीं मतलब से इज्ज़त दी जाती हैं...!**

### वेगळ्या वाटा

* इंग्रजीवर प्रभुत्त्व असेल तर या भाषेच्या अध्ययनाचं काम करता येईल. रशियन, मँडरिन, कोरियन अशा भाषा शिकून दुभाषा होता येईल. विविध देशांमध्ये इंग्रजीच्या शिक्षकांना मागणी असते. या निमित्ताने तुम्ही भरपूर फिरू शकता.

* बऱ्याच कंपन्यांमध्ये ट्रॅव्हल रायटरचं पद असतं. यासोबतच तुम्ही ट्रॅव्हल ब्लॉग सुरू करू शकता. प्रवासाशी संबधित मासिकं तसंच वृत्तपत्रांना लेख पाठवू शकता. छंद म्हणूनही तुम्ही हे लेखन करू शकता.

### भटकंती — लुटा कॅम्पिंगचा आनंद

पाच दिवस भरपूर काम केल्यावर सुट्टीच्या दिवशी एखाद्या रमणीय ठिकाणी भटकण्याची मजाच काही वेगळी. हा आनंद द्विगुणीत करण्यासाठी तुम्ही कॅम्पिंगही करू शकता. नव्या उत्साहाने आठवड्याची सुरूवात करण्यासाठी खालील काही ठिकाणी दोन दिवस घालवाच.



* ठाण्यातला तानसा तलाव एक ऑफ बीट ठिकाण आहे. शहरातल्या प्रदूषणापासून लांब असणाऱ्या तानसाच्या किनारी तंबू ठोकून तुम्ही निवांत क्षण अनुभवू शकता. निसर्गाच्या इथल्या निसर्गाच्या सानिध्यात रममाण व्हाल. * लोणावळ्यापासून दहा किलोमीटर अंतरावर शिरोता तलाव आहे. इथे तुम्ही वन्य जीवन अनुभवण्यासोबतच ट्रेकिंगचा आनंद घेऊ शकता. रात्री कॅम्प फायरचा अनुभवही घेता येईल. * इगतपुरीजवळ भंडारदरा हे ठिकाण आहे. पावसाळ्यात इथल्या धबधब्याखाली भिजण्याची मजाच वेगळीच. इथे तुम्ही मौजमस्ती करू शकता. इथल्या तलावाजवळ तंबूत राहण्याची व्यवस्था आहे. इथून नाशिकलाही जाता येईल. * पवना तलाव छोट्या ब्रेकसाठी उत्तम ठिकाण. इथल्या हिरव्यागार मैदानात तंबूत राहणं म्हणजे स्वर्गीय सुखच. तिकोना, लोहगड, तुंग हे किल्लेही परिसरात आहेत.

### खेचाखेची — संशय

संशय घ्यायला काहीच मर्यादा नसते.

मी ऑफिसमधून घरी येत होतो आणि शेजारीण माहेरून. दोघेही गल्लीत सोबतच आलो.

.
.
.

लगेच बायकोचा प्रश्न, आणायला गेला होतात का?

### वेगळं काही

अमेरिकेतल्या वरमोंटमधल्या 'फेअर हेवन' शहरात एक बकरा महापौर बनला. गंमत म्हणजे इथे महापौरपदासाठी निवडणूक झाली. या बकऱ्यासोबतच इतर १५ प्राणी उमेदवार होते. अवघ्या तीन वर्षांचा लिंकन नावाचा बकरा या शहराच्या महापौरपदी विराजमान झाला. फेअर हेवन या शहराची लोकसंख्या अवघी अडीच हजार आहे. महापौरपदासाठी इथे १५ प्राणी रिंगणात होते. लिंकनला सॅमी नावाच्या कुत्र्याने जोरदार टक्कर दिली. पण लिंकनच वरचढ ठरला. प्राणी महापौरपदी असल्यामुळे इथल्या कामकाजाची जबाबदारी प्रबंधक जोसेफ गंटर यांनी सांभाळली. पण महत्त्वाच्या सरकारी कार्यक्रमांमध्ये लिंकनची उपस्थिती गरजेची असेल.


### मंथन — गरज विचार बदलण्याची

आहेराच्या देवाणीघेवाणीविरुद्ध असणाऱ्या वामनरावांनी आपल्या मुलीच्या म्हणजेच जुईच्या लग्नात नातेवाईकांनाही आहेर केले नाहीत आणि आपल्यालाही आणू नयेत असं सांगितलं. त्यांचं म्हणणं योग्यच होतं. लग्नात पाहुण्यांनी अगत्यानं येणं, शुभाशीर्वाद देणं महत्त्वाचं असतं. आहेर घेणं म्हणजे आपण केलेल्या सरबराईचं मोल वसूल करून घेतल्यासारखं त्यांना ते वाटत होतं. त्यांचा लांबचा मामेभाऊ सहसा अशा कोणत्याच समारंभांना जात नसे.



इतरांनी आणलेल्या महागड्या आहेरांसमोर आपला आहेर नगण्य दिसत असल्यामुळे त्याला ओशाळल्यासारखं वाटत असे. परंतु या लग्नात तो उत्साहानं सहभागी झाला. अनेक लोक आले आणि जुईला मनापासून आशीर्वाद आणि शुभेच्छा देऊन गेले. खरोखरच किती योग्य निर्णय होता तो! अन्यथा अनेक लग्नं मानपानावरूनच लक्षात राहतात. सुखी संसारातील हे किल्मिष नंतर कायमच दोघांच्या सुखात अडथळा बनून पुढे येत राहतं. पैसा किंवा दागदागिने अगर मानपान यांच्या क्षणिक मोहापायी सुंदर आयुष्यात आणि संसारात असा मीठाचा खडा टाकणाऱ्या या प्रथा आपण का पाळाव्यात असा विचार आताच्या पिढीनं जरूर केला पाहिजे.

## शब्दकोडे क्रमांक २१६६



**आडवे शब्द :-**
१) गपणतीला आवडणारा पदार्थ
४) पायापासून डोक्यापर्यंत
१०) हिरव्या विषारी सापाची एक जात
१२) कच्चे रेशीम धुताना निघणारा गाळसाळ
१३) पदार्थाच्या आवरणावरील निघालेला छोटा तुकडा
१५) कपाटातील कप्पा
१६) लुगडे
१७) दुसऱ्यांची सोंगे हुबेहुब घडविणारा
१९) अष्टविनायकातील मयुरेश्वराचे गाव
२१) आंब्याची बी
२२) सोन्याचा कस
२३) ऋण
२४) चांदणी
२५) कणीदार (तूप)
२८) अधाशी, अतिशय खाणारा
२९) छताच्या भोकातून जमिनीवर पडणारे प्रकार किरण
३१) सर्वात खालचे पाताळ
३४) मन, मनातील विचार
३५) निरुपयोगी, नोकरी नसलेला
३७) तपस्या
४०) लहान
४१) पती
४३) संतोष
४५) चुणचुणीत, हुशार
४६) सरस्वतीचे एक नाव
४७) पशू
४९) ठराविक रक्कम
५१) तृष्णा
५३) व्यवस्थित
५४) वल्लरी
५५) मूल
५७) श्रीरामाची चरित्रगाथा
५९) सोन्या-चांदीच्या वस्तू तयार करणारा
६१) सरिता
६२) सोने-चांदी विकणारा व्यापारी
६४) टेका, आश्रय, प्रमाण
६५) हावरटपणा
६८) गुंतून जाड झालेची केसांची बट
६९) संध्याकाळ
७०) स्तुती करणारा
७१) युवराज.

**उभे शब्द :-**
१) श्रीकृष्णाचे एक नाव
२) किंमत
३) भक्कम, मजबूत
४) आरोप
५) पूर्वीच्या रेल्वेत वापरला जाणारे खाणीतील काळे ज्वालाग्रही खनिज
६) स्तुती स्तोत्र
७) बडबड
८) जुगाराचा एक प्रकार
९) नरमांजर
११) हल्या, रेडा
१४) इतर, बाकीचे
१८) लाच खाणारा
१९) साखरेचा पाक व आवळा यांचा औषधी पदार्थ
२०) नवरदेव
२४) दही घुसळून केलेला पातळ पदार्थ
२६) उत्तराधिकारी
२७) वजनाला कमी असलेला
३०) माल, वस्तू
३२) घोड्याचे घर
३३) विविध
३६) जिव्हा
३७) पुराव्यासह, आधारासह
३८) द्रव्य, संपती
३९) पुस्तके वाचावयास मिळण्याचे ठिकाण
४०) शर्करा
४२) चणचण, वानवा, उणीव
४४) आत्या (ग्रा.)
४६) उत्तम घोडा
४७) लोकांचे मत, विचार इ.
४८) किरकोळ सामान
५०) प्रेत
५२) मोठी टोपली
५६) व्यत्यय (हिं.)
५८) यद्यपी, कलाबूतीचे
५९) अमृत
६०) द्रवपदार्थ, उसाचे पेय
६३) एक कडधान्य
६४) सांप्रत दिवस
६६) बारा महिन्याचा काळ
६७) गवंडी.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



### प्रभावती सोनवणी यांचे निधन



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** दहीपूल येथील रहिवासी प्रभावती पद्माकर सोनवणी (वय ७७) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या कापड बाजार येथील भारतीय क्षत्रिय आहिर शिंपी समाज विठ्ठल-रखुमाई मंदिर ट्रस्ट नाशिकचे मार्गदर्शक हेमंत सोनवणी, मेनरोड येथील मे. हरी सिताराम सोनवणी कापड दुकानाचे संचालक नितीन व सचिन सोनवणी, विठ्ठल-रखुमाई मंदिर ट्रस्ट नाशिकचे विद्यमान सचिव बिपिन सोनवणी यांच्या मातोश्री व ज्येष्ठ पत्रकार धनंजय वाखारे यांच्या मावशी होत.

### जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. ९/३/२०२६ रोजी जाहीर करते की, माझे पती **आनंद देवीदास मून** यांचा मृत्यू दि. ३१/१२/२०२५ रोजी झाल्याने त्यांच्या नावावर असलेली फोरव्हीलर गाडी क्रमांक MH 15 JM 2932, टूव्हीलर गाड्या क्रमांक MH 15 DB 7723 व MH 15 AT 4478 या तीनही गाड्या माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती सरला आनंद मून** रा. ४, राधागिरी अपार्टमेंट, सनराज बिल्डिंगजवळ, राजीवनगर, नाशिक वारस हक्कदार (पत्नी) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर एक फोरव्हीलर व दोन टूव्हीलर अशा तीन गाड्या माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/-
**श्रीमती सरला आनंद मून**

### जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. ९/३/२०२६ रोजी जाहीर करते की, माझे पती **अनंत एकनाथराव आढाव** यांचा मृत्यू दि. २५/९/२०२० रोजी झाल्याने त्यांच्या नावावर असलेली फोरव्हीलर गाडी क्रमांक MH 20 CH 2181 व टूव्हीलर गाडी क्रमांक MH 20 DM 2181 या दोन्ही गाड्या माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती नयना अनंत आढाव** रा. साखरे मंगल कार्यालयामागे, प्लॉट नंबर २६, जिव्हेश्वर कॉलनी, एन-८, सिडको, संभाजीनगर (औरंगाबाद), वारस हक्कदार (पत्नी) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, संभाजीनगर (औरंगाबाद) यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर फोरव्हीलर व टूव्हीलर अशा दोन गाड्या माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, संभाजीनगर यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/-
**श्रीमती नयना अनंत आढाव**

सभी शुभअंक संख्याशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।

सोमवार
९/३/२०२६
कल्याण शुभअंक

| | | |
|---|---|---|
| ३ | ४ | ५ |
| २४७ | १३० | १६८ |
| ४९० | ३५६ | १७७ |
| ३३ | ४६ | ५५ |
| ३५ | ४८ | ५७ |

सोमवार
९/३/२०२६
मुंबई शुभअंक

| | | |
|---|---|---|
| १ | २ | ६ |
| १४६ | २३७ | १७८ |
| २९० | ५८९ | २६८ |
| ११ | २४ | ६२ |
| १३ | २६ | ६४ |

### छोटी जाहिरात

**ज्योतिष**

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभूज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :-** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

# लासलगाव येथील हिंदू संमेलन उत्साहात



**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :–** लासलगाव मंडलातील हिंदू बांधवांच्या वतीने परमपूज्य भगरी बाबा मार्केट यार्ड लासलगावच्या विस्तृत पटांगणावर भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

संमेलनामध्ये प्रमुख दोन व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. प्रमुख व्याख्याते ह. भ. प. सोपान दादा कनेरकर व केदारजी कुलकर्णी यांचे भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. लासलगाव येथील भक्तवत्सल बालाजी भगवान भक्त मंडळातील स्त्रियांच्या झांजर पथकाच्या व ढोलताशाच्या गजरात, भव्य शोभायात्रेत पुष्पवृष्टी करीत मान्यवरांचे व्यासपीठावर आगमन झाले. व्याख्यानाच्या प्रारंभी अखंड हिंदुस्तानची देवता भारतमाता व लासलगावचे आराध्यदैवत परमपूज्य श्रीसंत भगरीबाबा यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रमुख संत व कीर्तनकार मंडळी व्यासपीठावर उपस्थित होती. यामध्ये बहुरूपी महाराज, ह. भ. प. गणपत महाराज नागरे, ह. भ. प. शाम महाराज गांगुर्डे, चेतन महाराज महानुभाव व ह. भ. प. विक्रम काळे उपस्थित होते. प्रमुख व्याख्यातांचा सन्मान शहीद जवानांचे माता, पिता गोपाळा निंबाजी गोरडे, जनाबाई गोपाळा गोरडे व उत्तम बाबूराव ढोमसे, चेतन जनार्दन ढोमसे यांच्या हस्ते करण्यात आला. केदार कुलकर्णी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना ते संघाने आजवर केलेल्या विविध राष्ट्रभक्तीपर, धार्मिक, सांस्कृतिक कार्याचा आढावा मांडला. सन २०२५–२६ हे संघाचे शताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्त संपूर्ण भारत देशात सकल हिंदू संमेलने आयोजित करण्यात येत आहेत. ह. भ. प. सोपान कनेरकर यांनी हिंदू एकतेचे महत्त्व विशद केले, तसेच हिंदूंनी आपल्या धर्माचे व संस्कृतीचे पालन व अनुकरण केले पाहिजे.

पाश्चात्त्य संस्कृतीचे आचरण टाळावे. सर्व धार्मिक सण शांततेच्या मार्गाने साजरे करावे. स्त्रिया व मुलींनी स्वसंरक्षणाकरिता आपल्या वेशभूषेवर लक्ष दिले पाहिजे. भारतात अनेक जाती–धर्मांचे लोक राहतात. आपण सर्व हिंदू आहोत आदी विषयांवर प्रखर समाज प्रबोधन केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. भारत माता की जय वंदे मातरम आदी घोषणांनी परिसर दुमदुमला होता. याप्रसंगी लासलगाव मंडलातील हजारो श्रोते उपस्थित होते.

# बेकायदेशीर बेदाणा आयातीवर नियंत्रण ठेवा : खा. भास्कर भगरे

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** देशात वाढत असलेल्या बेकायदेशीर व कमी दर्जाच्या बेदाणा आयातीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली असून यासंदर्भात केंद्र सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खा. भास्कर भगरे यांनी केली आहे.

या वर्षी देशात परदेशातून मोठ्या प्रमाणावर बेदाण्यांची आयात होत असून, त्यातील काही मालाची गुणवत्ता व नियमांचे पालन याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. यामुळे देशातील द्राक्ष उत्पादक शेतकरी व बेदाणा प्रक्रिया उद्योगावर विपरित परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नाशिक जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अनेक भाग द्राक्ष उत्पादनासाठी प्रसिद्ध असून, येथील शेतकरी मोठ्या प्रमाणावर बेदाणा उत्पादन व प्रक्रिया उद्योगाशी जोडलेले आहेत; परंतु अनियंत्रित किंवा कमी दर्जाच्या आयातीमुळे बाजारभावावर दबाव येऊन स्थानिक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर खा. भास्कर भगरे यांनी केंद्र सरकारकडे काही मागण्या केल्या आहेत. त्यात देशात आयात होणाऱ्या बेदाण्यांची गुणवत्ता तपासणी करावी, बंदरांवर व सीमारेषांवर तपासणी यंत्रणा अधिक सक्षम करावी, बेकायदेशीर किंवा निकृष्ट दर्जाच्या आयातीवर कारवाई करावी, देशातील द्राक्ष व बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी आयात धोरणाचा पुनर्विचार करावा. खा. भगरे यांनी सांगितले, की देशातील शेतकरी व प्रक्रिया उद्योगाचे संरक्षण करणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यामुळे या विषयात केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. या विषयावर त्यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी ना. शिवराजसिंह चौहान व वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्याकडे पत्र पाठविले असून, आगामी लोकसभा अधिवेशनातही हा मुद्दा उपस्थित करणार असल्याचे खा. भास्करराव भगरे यांनी सांगितले.

# आदिवासी मुलींसाठी सैन्य व पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :–** प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प नाशिक कार्यालयामार्फत आदिवासी मुलींसाठी सैन्य व पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. या प्रशिक्षणासाठी दि. ६ ते २४ मार्च या कालावधीत आवश्यक पात्रतेनुसार सत्र क्रमांक १०१ साठी मुलींसाठी प्रवेश सुरू आहेत.

इच्छुक पात्र मुलींनी सैन्य व पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, पेठ रोड, नाशिक येथे आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभागाच्या प्रकल्प अधिकारी अर्पिता ठुबे यांनी प्रसिद्धिपत्रकान्वये केले आहे.

**अशी आहे आवश्यक पात्रता**

उमेदवार इयत्ता १२ वी उत्तीर्ण व अनुसूचित जमाती प्रवर्गातील असावा. वय १८ ते २५ वर्षे असावे. किमान उंची १५० से. मी., वजन ४८ किलोग्रॅम आवश्यक आहे. अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, इयत्ता १० वी व १२ वी गुणपत्रक, अधिवास प्रमाणपत्र, व नावनोंदणी प्रमाणपत्र आदी कागदपत्र आवश्यक आहेत. प्रशिक्षणाचा कालावधी हा चार महिन्यांचा असून, प्रशिक्षण सत्र दि. १ एप्रिलपासून सुरू होणार आहे. दि. २५ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता शारीरिक व बौद्धिक चाचणी घेऊन प्रशिक्षणार्थींची निवड केली जाणार आहे. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना भोजन, निवास व गणवेश सुविधा पुरविण्यात येणार आहे.

प्रशिक्षणात ग्रंथालय सुविधा, आधुनिक व्यायाम व सामान्य ज्ञान अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी केंद्रप्रमुख ह्न मोबाईल क्रमांक ९४२०२६९०२३ व उपकेंद्रप्रमुख –मोबाईल क्रमांक ८००७९८०९१६ यांच्याशी संपर्क साधावा, असेही सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांनी कळविले आहे.

# महाराष्ट्र कोहिनूर रत्न पुरस्काराने १०१ कर्तृत्ववानांचा गौरव



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** येथील गुरू–आराध्या फाऊंडेशनच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय महाराष्ट्र कोहिनूर रत्न पुरस्कार २०२६ सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

भागवताचार्य व श्रीशिवमहापुराण कथाकार ह. भ. प. डॉ. अर्चना आहेर यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संस्थापक–सचिव प्रा. ललित खैरनार, खजिनदार भाऊसाहेब आहेर आणि सदस्य गुरुप्रसाद आहेर यांच्या पुढाकाराने हा सोहळा पार पडला. या कार्यक्रमात आध्यात्मिक, समाजसेवा, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, कला, क्रीडा, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या १०१ कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा शाल, सन्मानचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व पुरस्कारार्थींना मानाचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. बालकीर्तनकार आराध्या आहेर हिने सादर केलेल्या गवळणीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सुरेखा यांनी विठूरायाच्या जागरासाठी सादर केलेल्या नृत्याने वातावरण भक्तिमय केले. सोहळ्यात नगरसेविका इंदूबाई नागरे, डॉ. डी. डी. धोंगडे–पाटील, विवेक शिंदे, निसर्गोपचारतज्ज्ञ महंत अवधूतगिरी महाराज, दीपक दीक्षित, वाल्मीक भागवत गोपालशास्त्री, अमोल गुंजाळ, अरविंद आहेर, नितीन शेवाळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान अनेक पुरस्कारार्थींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ललित खैरनार यांनी केले. गुरुप्रसाद आहेर यांनी आभार मानले.

# महिलांसाठी मोफत सायकल प्रशिक्षण शिबिर



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** महिला दिनाचे औचित्य साधून नाशिक सायकलिस्ट्स फाऊंडेशनतर्फे महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मोफत सायकल प्रशिक्षण शिबिराचा अनंत कान्हेरे मैदान येथे उत्साहात शुभारंभ करण्यात आला.

नाशिकच्या प्रथम नागरिक व महिला महापौर हिमगौरी आहेर–आडके यांच्या हस्ते सायकलची विधिवत् पूजा करून व सायकलीला पुष्पहार घालून शिबिराचा प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी छाया बैजल, माजी उपाध्यक्ष डॉ. मनीषा रौंदळ, सचिव नितीन कोटकर, संचालिका दीपाली माळी, सुरेश डोंगरे, कारभारी भोर, शुभम् भालेराव, मनोज गायधनी आदी मान्यवर उपस्थित होते. महापौर हिमगौरी आहेर–आडके यांचा सन्मान छाया बैजल यांच्या हस्ते सायकलीची प्रतिकृती असलेले सन्मानचिन्ह व शाल देऊन करण्यात आला. यावेळी महापौर हिमगौरी आहेर–आडके यांनी प्रशिक्षणार्थी महिलांसोबत सायकल चालवून त्यांचा उत्साह वाढविला. त्यांनी महिलांना सायकल चालविण्याचे आरोग्यदायी फायदे, तसेच शहराच्या पर्यावरण संवर्धनासाठी सायकलिंगचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमात मोठ्या संख्येने महिला प्रशिक्षणार्थी सहभागी झाल्या असून, नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्या महिला व पुरुष सदस्यांनी प्रशिक्षक म्हणून जबाबदारी पार पाडत उपक्रम यशस्वी केला.

# भाजपा नाशिक महानगराच्या वतीने रामभाऊ म्हाळगी यांना अभिवादन



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, आदर्श लोकप्रतिनिधी रामभाऊ काशीनाथ म्हाळगी यांचा स्मृतिदिन भारतीय जनता पार्टी कार्यालय, वसंतस्मृती येथे करण्यात आला. प्रारंभी मनपा गटनेते व भाजप नाशिक महानगर जिल्हा सरचिटणीस ॲड. शाम बडोदे, सुरेश पाटील व मध्य मंडल अध्यक्ष वसंत उशीर यांच्या हस्ते रामभाऊ काशीनाथ म्हाळगी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नंदकुमार देसाई, सुजाता करजगीकर, बबलू परदेशी, प्रदीप पाटील, विजय देवरगांवकर, सतीश भावे, संदेश बोरसे, अनिता भामरे, दयाराम पाटील, सुरेश मारू, महेश भामरे, आदित्य सोनवणे, हेमंत शिंदे, अभय छल्लाणी, नरेंद्र सोनवणे, संतोष नेरे, विजय कुलकर्णी आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ. सौ. सुहासिनी घोडके यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** डॉ. सुहासिनी घोडके यांचा ७१ वा वाढदिवस विकास मंदिर शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेविका श्वेता भंडारी होत्या. आपल्या मनोगतात त्यांनी सुहासिनीताईंच्या कार्याचे मनापासून कौतुक करत, त्यांच्या प्रदीर्घ आणि अथक प्रयत्नांचे फलित म्हणजे आजचे 'विकास मंदिर' असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास दिव्यांग सबलीकरण कार्यालयाचे अधिकारी भरत चौधरी, सुदाम, संजय शिंदे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी मदन बढे, रोटरी संजय कलंत्री आणि सेंट झेव्हीयरचे फादर ऑगस्टीन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

दिव्यांग विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाप्रसंगी सुहासिनी घोडके यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धर्मा सोनवणे, विनीता दास व प्रीती घोडके यांनी केले, राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र संघ मुंबईला हरवून अंतिम फेरीत

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** महाराष्ट्राचा २३ वर्षांखालील क्रिकेट संघ भारतीय क्रिकेट नियामक मंडळ–बीसीसीआयतर्फे होणाऱ्या २३ वर्षांखालील सी. के. नायडू ट्रॉफी स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे.

नाशिककरांसाठी अभिमानाची गोष्ट म्हणजे नाशिकचे विनोद यादव या संघाचे स्ट्रेंग्थ व कंडीशनिंग कोच–फिजिकल ट्रेनर आहेत. विशेष बाब म्हणजे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनमध्ये विनोद यादव गेली आठ वर्षे ही जबाबदारी अतिशय उत्तमरीत्या पार पाडत आहेत. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या गहुंजे येथील आंतरराष्ट्रीय मैदानावर झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात महाराष्ट्र संघाने मुंबईवर चार गडी राखून विजय मिळविला.

मुंबईने प्रथम फलंदाजी करून पहिल्या डावात २४८ धावा केल्या. सूर्यांश शेडगेने सर्वाधिक ८२ धावा केल्या. महाराष्ट्राच्या वैभव दारकुंडेने ५ बळी घेतले. नीरज जोशीच्या ७२ व दिग्विजय पाटीलच्या ६९ धावांच्या जोरावर महाराष्ट्राने २९२ धावा करून आघाडी घेतली.

दुसऱ्या डावात मुंबईने सूर्यांश शेडगेच्या नाबाद १३४ धावांच्या जोरावर ३०५ धावा केल्या. महाराष्ट्राने विजयासाठीच्या २६२ धावा कर्णधार सचिन धस नाबाद १२६ व नीरज जोशीच्या ६३ धावांच्या जोरावर चार गडी राखून पार करत मुंबईवर विजय मिळविला. अंतिम फेरीत महाराष्ट्राचा ९ ते १२ मार्चदरम्यान तामिळनाडूविरुद्ध सामना होणार आहे.

विनोद यादव यांच्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनमधील आतापर्यंतच्या या खास योगदानाबद्दल, नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचे चेअरमन विनोद शहा, सेक्रेटरी समीर रकटे यांनी अभिनंदन करून सी. के. नायडू ट्रॉफीच्या अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# श्री काळारामाला बांधला ३२ हात फेटा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला देशभरात सर्वत्र होलिकोत्सव साजरा होत असतो. या उत्सवाची तयारी प्रभू रामचंद्र यांच्यापासून केली जात असल्याची भावना असल्याने आमलकी एकादशीऐवजी चंद्रग्रहणानिमित्त श्री काळाराम मंदिरातील श्रीरामास स्नानानंतर पांढराशुभ्र झग्यांचा पोशाख परिधान करण्यात आला. यासह मस्तकी ३२ हात पांढराशुभ्र फेटा बांधून एकप्रकारे श्रीराम रंगोत्सव खेळण्यासाठी सज्ज झाले आहेत. होलिकोत्सवाच्या निमित्ताने श्रीरामांना मस्तकी पट्टबंध बांधणे याला पाटोत्सव म्हणतात. फेटा नेसवायच्या आधी रामरायांना १६ पुरुषसूक्ताद्वारे महापूजा संपन्न केली गेल्यावर विधीपूर्वक प्रथम श्वेतवस्त्र झगा पोशाख



सीतादेवींना साडीचोळी नेसवून मग श्रीरामांना प्रथम फेटा बांधायला सुरुवात करतात. ही परंपरा पुजारी घराण्यातील २७ पिढ्यांच्या वारसांकडून गेली अनेक शतके अखंड पालन केली जात आहे.

पं. प्रणव पुजारी पुजारी यांनी महापूजा पार पाडल्यानंतर फेटा बांधण्यात आला. श्रीमहंत सुधीरदास महाराज, सचिन पुजारी, विश्वस्त प्रतीक पुजारी व दीपक कुलकर्णी यांनी पौरोहित्य केले. रंगपंचमीच्या दिवशी केशर व पळसाच्या फुलांचा रंग उकळून त्याचा रंग काळारामास लावला जातो. वासंतिक नवरात्राचे यावर्षीचे उत्सवाचे मानकरी नरेंद्र बुवा पुजारी यांच्या हस्ते श्री रामरायाला श्रीखंडाचा नैवेद्य, श्वेत वस्त्रावर रंग व गुलाल टाकल्यावर नाशिककरांची रंगपंचमीचा रहाड उत्सव सुरू होत असल्याची परंपरा आहे.

## जाहीर समन्स

ॲड. श्री.बी.एन.शिंदे

नाशिक येथील मे. न्यायाधीश, सहकारी न्यायालय, यांचे न्यायालयात...

जनलक्ष्मी सहकारी बँक लि.नाशिक (शेड्यूल्ड बँक) ... वादी
समृद्धी, गडकरी चौक, जुना आग्रारोड, नाशिक

विरुद्ध

... प्रतिवादी

| अ. नं. | सहकार केस क्रमांक | प्रतिवादीचे नांव व पत्ता | प्रतिवादी क्रमांक | दावा रक्कम रुपये | कोर्टात हजर राहण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | ४०७/२०२४ | **श्री.अमित अंतोन पानपाटील** साईदत्त को–ऑप.हौसिंग सोसायटी, स.नं.२९८, प्लॉट नं.११, पाथर्डी फाटा, नाशिक. | १ | ५२,१५५/– | १३.०४.२०२६ |
| २. | ४०७/२०२४ | **श्री.अरुण गणपत जाधव** मु.वऱ्हेदारणा, पो.दारणा सांगवी, ता.निफाड, जि.नाशिक. | २ | ५२,१५५/– | १३.०४.२०२६ |
| ३. | ४१६/२०२४ | **श्री.रोहीत रविंद्र परब** २, मोहन संकुल अपार्टमेंट, विशाखा कॉलनी, राजीवनगर, नाशिक. | १ | ८९,७८४/– | १३.०४.२०२६ |
| ४. | ४१६/२०२४ | **श्री.नवनाथ गंगाधर चव्हाण** ५, नवजीत सोसायटी, कोहीनुर कॉलनी, राजीवनगर, नाशिक. | ३ | ८९,७८४/– | १३.०४.२०२६ |

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्या विरुद्ध न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे जाहीर समन्स नोटीसद्वारे आपणांस सूचित करण्यात येते की, आपण व्यक्तिशः अथवा योग्य रितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी जो या दाव्याच्या संदर्भात सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत या न्यायालयामध्ये **दिनांक १३/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** सदरील दाव्यामधील आपल्या विरुद्ध करण्यात आलेल्या मागणीच्या संदर्भात आपले म्हणणे व पुरावे दाखल करणेसाठी हजर राहावे. वर उल्लेखिलेल्या तारखेस व वेळेवर आपण हजर न राहिल्यास सदरील दाव्याचा निकाल आपले गैरहजेरीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक ०६/०३/२०२६ रोजीच्या मा.न्यायाधिश, सहकारी न्यायालय, नाशिक यांच्या हुकुमावरून हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ : नाशिक.**
**दिनांक : ०७/०३/२०२६**
**पत्ता :** मे.न्यायाधिश, सहकार न्यायालय, नाशिक
पिनॅकल मॉल, ४था मजला, त्र्यंबकनाका सिग्नलजवळ,
जुना आग्रारोड, नाशिक ४२२ ००२.

कोर्टाचा शिक्का

**सही**
**शिरस्तेदार**
सहकारी न्यायालय, नाशिक, जि.नाशिक

# गणित विज्ञान प्रदर्शनातून घडतील भविष्यातील वैज्ञानिक



**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :–** नूतन विद्याप्रसारक मंडळाच्या इंग्लिश मीडियम स्कूल लासलगावमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान–गणित प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

विशेष अतिथी व उद्घाटक म्हणून शाळेची माजी विद्यार्थिनी डॉ. मानसी थोरात उपस्थित होत्या, तसेच शाळेचे जनरल सेक्रेटरी गोविंदराव होळकर यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान दिनाच्या शुभेच्छा दिल्या व बालवैज्ञानिकांना भविष्यात उज्ज्वल यशासाठी आशीर्वाद दिले. अध्यक्ष संदीप होळकर, सदस्य हसमुख पटेल, सचिन मालपाणी, चंद्रशेखर होळकर, योगेश पाटील, मुख्याध्यापिका शीतल आचार्य, उपमुख्याध्यापिका मीनल होळकर, विभाग प्रमुख नीता जेजुरकर, तुकाराम केदारे आणि मंजू वाधवा आदी उपस्थित होते.

शालेय स्तरावर नियमितपणे गणित–विज्ञान प्रदर्शने आयोजित करण्यात यावीत, यातूनच विद्यार्थ्यांच्या कल्पनेला वाव मिळेल व वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागून भविष्यातील वैज्ञानिक घडतील, असे प्रतिपादन मानसी थोरात यांनी केले. नर्सरी ते नववीच्या एकूण २८५ विद्यार्थ्यांनी ७४ उपकरणे सादर केली व त्यांची माहिती भेट देणाऱ्यांना दिली. पूर्वप्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध फळभाज्या, पालेभाज्या त्यांची ओळख आणि त्यांचे उपयोग, तसेच ठिबक सिंचनाचा वापर याविषयी सादरीकरण केले. इतर विद्यार्थ्यांनी विविध ज्ञानेंद्रिये, मधमाशांची जीवनशैली, सौर ऊर्जा, शरीररचना, आधुनिक शेती, जलचक्र, विविध ऋतू, प्रदूषण नियंत्रण, विविध गणितीय संकल्पना, दुर्बिण घनकचरा व्यवस्थापन यासाठी एआयचा वापर करून विविध उपकरणे सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अवंती पुंड हिने केले.

आभारप्रदर्शन समृद्धी ठोंबरे हिने मांडले. अर्णव उपाध्ये याने विज्ञानदिनाची माहिती दिली. संगीत विभागाने स्वागत गीत सादर केले. विशाखा केंगे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


महावितरण

## ई–निविदा सुचना

मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., नाशिक शहर-1 विभाग, (भ्रमणध्वनी क्र. 7875766423) यांचेकडून मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून नाशिक शहर-1 विभाग अंतर्गत खालील कामांकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,च्या www.mahadiscom.in संकेतस्थळावर सविस्तर निविदा दि.06.03.2026 ते दि.16.03.2026 पर्यंत माहितीसाठी उपलब्ध आहे.

| निविदा क्रमांक | निविदा कामाचे स्वरुप | निविदा रक्कम | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| ई.ई./ना.श.वि.-1/टी-31/2025-26<br>ई.ई./ना.श.वि.-1/टी-32/2025-26<br>ई.ई./ना.श.वि.-1/टी-33/2025-26 | नाशिक अर्बन 1 विभागांतर्गत 2026-27 या वर्षासाठी 1) रोहित्र 2) एच.टी.लाईन 3) एल.टी. लाईन यांची प्रतिबंधात्मक देखभाल करणे याची निविदा. | 1) रु.20,00,000/-<br>2) रू.40,00,000/-<br>3) रु.40,00,000/- | 1) रु.20,000/-<br>2) रू.40,000/-<br>3) रु.40,000/- |

PRO no. 081/2026 — कार्यकारी अभियंता, नाशवि-1, नाशिक

# संपादकीय

## युद्धाच्या झळा

पश्चिम आशियातील आखाती परिसरात इराण विरुद्ध इस्त्राईल-अमेरिका यांच्या सुरू असलेल्या युद्धाच्या झळा आता महाराष्ट्राला जाणवायला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी इंधनाचे आणि गॅसचे दर वाढायला सुरुवात झाली आहे. विशेषत: पुण्यात येत्या काही दिवसांमध्ये भीषण इंधनटंचाई निर्माण होण्याचे संकेत मिळत आहेत. पुण्यात सीएनजी आणि एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण होण्यास सुरुवात झाली होती. त्यानंतर आता युद्धामुळे पुण्यात पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढण्याची शक्यता आहे. तेल कंपन्यांनी पुण्यातील पेट्रोल आणि डिझेल पंपचालकांना मेसेज पाठवले आहेत. युद्ध पेटल्यामुळे येणाऱ्या खनिज तेलाच्या उपलब्धतेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे रोज पेट्रोल, डिझेल हवे असेल, तर ॲडव्हान्स पैसे भरा. हे पैसे भरल्यानंतर पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू राहील, असे मेसेज संबंधित पेट्रोल पंपचालकांना पाठविण्यात आले आहेत. यापूर्वी तेल कंपन्यांकडून पेट्रोल आणि डिझेल पंपचालकांना सात ते आठ दिवसांचे क्रेडिट मिळत होते; मात्र आता पैसे भरल्याशिवाय पेट्रोल आणि डिझेल मिळणार नाही, असा संदेश तेल कंपन्यांनी पाठवला आहे. इराण विरुद्ध अमेरिका युद्धामुळे पश्चिम आशियातून होणारी इंधनाची वाहतूक बंद झाली आहे. कतारमधून होणारा नैसर्गिक वायूचा पुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात इंधन आणीबाणी लागू होण्याची चिन्हे दिसत आहेत. पुण्यात घरगुती गॅस सिलिंडरच्या वाढलेल्या दरांमुळे महिलांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सिलिंडरचे दर सातत्याने वाढत असल्याने त्याचा थेट परिणाम त्यांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. महिलांचे म्हणणे आहे, की गॅसचे दर वाढत आहेत, तेलाचे दर वाढत आहेत, किराणा आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे दरही वाढले आहेत; मात्र आमचे पगार काही वाढत नाहीत. गॅस एजन्सीकडे गेल्यानंतर अनेक वेळा वेळेवर गॅस मिळत नाही, अशी तक्रारही महिलांनी केली आहे. काही ठिकाणी गॅस उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते, तर काही वेळा ब्लॅकमध्ये गॅस विकला जात असल्याचा आरोपही महिलांनी केला; मात्र ब्लॅकमध्ये गॅस घेणे सर्वसामान्य कुटुंबांना परवडणारे नाही. घरखर्च आधीच वाढला आहे. अशा परिस्थितीत गॅस सिलिंडरचे वाढते दर आम्हाला कसे परवडायचे? घर चालवायचे तरी कसे? असा सवाल सामान्य गृहिणी विचारत आहेत. अमेरिका, इराण आणि इस्त्राईलमधील युद्धामुळे जागतिक पातळीवर परिणाम होत असून, त्याचा फटका भारतालाही बसत आहे. सध्या देशात एलपीजी गॅसच्या तुटवड्याची परिस्थिती जाणवत आहे. याचा सर्वांत मोठा परिणाम हॉटेल उद्योगावर झाला आहे. कमर्शिअल एलपीजी गॅसचे दर अचानक १५० ते २०० रुपयांनी वाढले आहेत. यामुळे हॉटेल व्यवसाय पुढे कसा चालवायचा, हा प्रश्न व्यावसायिकांसमोर उभा राहिला आहे. सध्या गॅस सप्लाय कधी सुरळीत होईल, याबाबतही कोणतीही स्पष्टता नाही. हॉटेलमालकांचा सरकारकडे असा आग्रह आहे, की त्यांनी त्वरित सहकार्य करून गॅस पुरवठ्यात सुधारणा करावी.

## टवाळखोराकडून विद्यार्थिनीवर रॉडने हल्ला; घोटीतील घटना

**इगतपुरी (भ्रमर वार्ताहर) :-** घोटी शहरातील श्रीरामवाडी परिसरात ''माझ्याशी बोलत का नाही?'' असा जाब विचारत एका टवाळखोराने दहावीतील विद्यार्थिनीच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी घोटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत सचिन वसंत चव्हाण (वय ४८, रा. आरोटेनगर) यांनी घोटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार त्यांची मुलगी ही घोटी शहरातील जनता विद्यालयात इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत असून, ती दररोज घरापासून शाळेत पायी जात असते. सुमारे एक वर्षापासून गौरव ऊर्फ दक्ष भास्कर चौधरी, रा. मार्केट कमिटी मागे, इंदिरानगर, घोटी हा माझ्या मुलीचा पाठलाग करून ''माझ्याशी बोल,'' अशी जबरदस्ती करीत असल्याची तक्रार कुटुंबीयांनी यापूर्वी शाळेत दिली होती. त्यावेळी शाळा प्रशासनाने संबंधित मुलाला समज दिली होती. मात्र त्यानंतरही त्याचा त्रास सुरूच असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, दि. ४ मार्च रोजी विद्यार्थिनीचा दहावीचा हिंदी विषयाचा पेपर होता. पेपर संपल्यानंतर ती आपल्या मैत्रिणीसह दुपारी सुमारे २.४५ वाजता श्रीरामवाडी पुलाजवळून घरी परतत असताना आरोपी दक्ष चौधरी हा त्यांच्या मागे आला. त्याने आजचा पेपर कसा झाला? असे विचारत संवाद साधण्याचा प्रयत्न केला.

मात्र विद्यार्थिनीने दुर्लक्ष करून पुढे निघून गेल्यावर आरोपीने संतापाच्या भरात त्याने हातातील लोखंडी रॉडसारख्या वस्तूने विद्यार्थिनीच्या डोक्याच्या मागील बाजूस वार केला व तेथून नाशिक महामार्गाच्या दिशेने पळ काढल्याचे मैत्रिणीने कुटुंबीयांना सांगितले.

या हल्ल्यात विद्यार्थिनी जखमी झाली असून, तिला प्रथम घोटी येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यानंतर पुढील उपचारासाठी तिला नाशिक येथील सिव्हिल रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या घटनेमुळे घोटी शहरात संताप व्यक्त केला जात असून, अशा प्रकारांवर तत्काळ आळा घालण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, घोटी पोलीस ठाण्यात आरोपी गौरव ऊर्फ दक्ष भास्कर चौधरी याच्याविरोधात विनयभंग व मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान, घोटी शहरात अलीकडच्या काळात मुलींच्या छेडछाडीच्या घटना वाढत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. त्यामुळे कुठे गेला कायद्याचा बालेकिल्ला? असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दोन दिवसांपूर्वी टोल नाक्यावर झालेल्या मारहाणीच्या घटनेत पोलिसांनी दोन युवकांची धिंड काढली होती; मात्र येथे एका विद्यार्थिनीवर थेट लोखंडी रॉडने हल्ला झाल्यानंतरही आरोपीवर कठोर कारवाई होईल का, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. काही दिवसांपूर्वी बलायदुरी येथील माजी सरपंचांनी परिसरातील काही टवाळखोरांना मुलींची छेड काढू नका, असा जाब विचारला असता त्यांनाही मारहाण करण्यात आली होती. त्यामुळे घोटी शहरात टवाळखोरांचा वाढता उपद्रव चिंतेचा विषय ठरत आहे. विशेष म्हणजे जनता विद्यालय परिसर, आदर्श कन्या विद्यालय, ज्युनिअर कॉलेज, घोटी बस स्टॉप, तसेच मुलींच्या शाळेत ये-जा करण्याच्या रस्त्यावर अनेकदा टवाळखोरांची गर्दी होत असल्याची तक्रार स्थानिकांकडून केली जात आहे. शाळा सुटण्याच्या वेळेत काही युवक रस्त्यावर उभे राहून मुलींना त्रास देत असल्याचेही नागरिक सांगतात. त्यामुळे या भागात पोलिसांनी नियमित गस्त वाढवावी व टवाळखोरांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे.

## सुकाकाथ मसाला

### प्रेमाचे शब्द

मालतीबाई आणि त्यांचे पती माधवराव यांचे एके दिवशी कशावरून तरी कडाक्याचे भांडण झाले. त्यामुळे माधवराव वैतागले होते. त्यांनी घरात त्या दिवशी जेवण घेतलेच नाही; परंतु शेवटी भूक ही लागणारच; परंतु बायकोकडे मागायचे कसे या हिशेबाने ते समोरच्या इराण्याच्या हॉटेलमध्ये गेले. तेव्हा ते जरा तावातच होते. तेथे एक सुंदर मुलगी वेटर म्हणून कामाला होती. तिने माधवरावांना विचारले. ''व्हॉट कॅन आय डू सर,'' तिचा मंजूळ आवाज ऐकून माधवराव पघळले व तिला म्हणाले, ''मला दोन प्रेमाचे शब्द आणि काही तरी खायला आण, भूक लागलीय,'' माधवरावांची ही ऑर्डर घेऊन ती तरुणी गेली आणि येताना तिने प्लेटमध्ये दोन उकडलेली अंडी आणून त्यांच्यासमोर ठेवली आणि म्हणाली, ''डियर माधव, ही अंडी खाऊ नका, ती आठ दिवसांची शिळी आहेत. तुम्हाला गडे त्रास होईल की नाही!''

– पानवाला

## खाण्यासाठी चेंज हवा?

### ऑरेंज सिरप

'क' जीवनसत्त्वयुक्त ऑरेंज सिरपहे उष्णता व थकवा घालविणारे उन्हाळ्यातील अत्यंत आरोग्यवर्धक असे पेय आहे.

**साहित्य :-** ४ संत्री, साखर, २ बाटल्या सोडा, १ मोठा कप आईस्क्रीम.

**पाककृती :-** संत्र्याचा रस काढून त्यात चवीनुसार साखर घालावी. नंतर ते मिश्रण फ्रिजमध्ये ठेवून थंडगार करावे. आयत्या वेळी त्यात सोडा ओतून वर आइस्क्रीम घालावे. म्हणजे सिरप आणखी लज्जतदार लागते.

**पीयूष :-** दही घालून केलेले गोड पीयूष हे उष्णता घालविण्यासाठी उन्हाळ्यातील अत्यंत उपयुक्त असे पेय आहे.

**साहित्य :-** ४ वाट्या गोड ताजे दही, १०० ग्रॅम साखर, किंचित लिंबाचा रस, जायफळ पूड, केशर.

**कृती :-** प्रथम दही साखरेसह मिक्सरमधून घुसळून घ्यावे.त्यात किंचित लिंबाचा रस, जायफळाची पूड व केशर घालून चांगले घुसळून घ्यावे. हे पीयूष ४ जणांना पुरेल. सर्व्ह करताना त्यात बर्फाचा खडा टाकावा.

– ऐश्वर्या राजेंद्र काळे

## मुंबई-आग्रा महामार्गावर अपघात; तीन ठार, तीन जखमी

**देवळा (भ्रमर वार्ताहर):-** तालुक्यातील उमराणे परिसरातील राष्ट्रीय मुंबई-आग्रा महामार्गावर जुन्या गंगा हॉटेलजवळ शुक्रवारी (दि. ६ मार्च) सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास हृदय पिळवटून टाकणारा भीषण अपघात झाला. या दुर्दैवी अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली असून, तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, नाशिकहून मालेगावच्या दिशेने जात असलेली टाटा पंच कार अचानक चालकाचा ताबा सुटल्याने नियंत्रणाबाहेर गेली. त्यानंतर गाडी रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. अपघात इतका भीषण होता, की गाडी जागेवर उलटी झाली आणि काही क्षणांतच आनंदाचा प्रवास दु:खद दुर्घटनेत बदलला.

या अपघातात चालक दीपक किशोर निफाडे (वय ३८), त्यांचा लहान मुलगा प्रथमेश दीपक निफाडे (वय अंदाजे ४ वर्षे) आणि त्यांची बहीण अंकिता किशोर निफाडे यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे वृत्त मिळत आहे. एका निष्पाप चार वर्षांच्या चिमुकल्यासह तिघांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे, तर चालकाचे काका, काकू व पत्नी हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. जखमींपैकी एका जखमीला पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलविण्यात आल्याची माहिती मिळत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोकाचे वातावरण पसरले असून, नागरिक तीव्र हळहळ व्यक्त करीत आहेत.

अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. चिंचवे येथील बाबाजी रुग्णवाहिका, तसेच उमराणे येथील जे. के. रुग्णवाहिकेचे चालक राहुल वाघ व गणेश पवार हे घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तातडीने रुग्णवाहिकेतून मालेगाव येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यात तीन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, राष्ट्रीय मुंबई-आग्रा महामार्गावरील वाहतूक दिवसेंदिवस बेशिस्त होत असल्याची तक्रार नागरिकांकडून व्यक्त होत आहे. अनेक वाहनचालक अतिवेगाने वाहने चालवीत असल्यामुळे वारंवार अपघात होत असून, निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन महामार्गावर गती नियंत्रित करणारे कॅमेरे बसवावेत, तसेच वाहतुकीवर कडक नियंत्रण ठेवून योग्य शिस्त लावावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. या घटनेची माहिती देवळा पोलीस ठाण्याला मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, याबाबत पुढील तपास सुरू आहे.

## देवळा अभिनव व जनता विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

**देवळा (भ्रमर वार्ताहर) :-** 'मविप्र'संस्थेच्या येथील अभिनव व जनता विद्यालयात राष्ट्रीय विज्ञानदिन मुख्याध्यापक मनीष बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी शिक्षिका शीतल जाधव होत्या. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. सी. व्ही. रमण व डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रास्ताविक विज्ञान शिक्षिका कामिनी वाघ यांनी केले. यानंतर वैज्ञानिक रांगोळी प्रदर्शनाचे दालनाचे उद्घाटन ज्ञानेश्वर आहेर, तर वैज्ञानिक प्रदर्शनाच्या दालनाचे उद्घाटन शीतल जाधव यांनी केले.

वैज्ञानिक प्रतिकृती व वैज्ञानिक रांगोळ्यांमधून यावेळी प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले. त्यात इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनी आरोही आहेर व प्रीती जाधव यांनी उत्सर्जन संस्थेची रांगोळीत प्रथम क्रमांक मिळविला.

## रमजानच्या तिसऱ्या शुक्रवारी हजारो भाविकांकडून नमाज पठण

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** शासनाकडून नवनवीन कायदे अंमलात आणले जात आहेत. या पार्श्वभूमीवर मुस्लिम बांधवांनी आपली कागदपत्रे अपडेट करून ठेवावीत, तसेच सोशल मीडियाचा वापर मर्यादित स्वरूपात करावा. अज्ञात व्यक्ती व परदेशातील व्यक्तींच्या चॅनलला सबस्क्राईब करू नयेत, असे आवाहन मौलाना इब्राहिम कोकणी यांनी केले आहे.

दि. ६ रमजानमधील तिसऱ्या शुक्रवारी दुपारी जुम्माच्या सामुदायिक नमाजापूर्वी घास बाजारातील शाही मशिदीत प्रवचन देताना त्यांनी हे आवाहन केले. यावेळी मशिदीत सुमारे पाच हजार मुस्लिम बांधव उपस्थित होते. दरम्यान, जकात वाटप करताना सर्वप्रथम रक्ताच्या नात्यातील व्यक्तींची मदत करावी. यानंतर मोहल्ल्यातील गरीब व इतर गरजू लोकांचा शोध घेऊन त्यांची मदत करावी, असे आवाहनदेखील मौलाना कोकणी यांनी केले. दरम्यान, काल रमजानमधील शुक्रवारचा योग साधत बागवानपूरा येथील हजरत अमीन शाह हुसैनी चौकातील ऐतिहासिक कादरी मशिदीचे नव्यानेच नूतनीकरण केलेले मुख्य हॉलमध्ये नमाजास पूर्ववत् सुरुवात करण्यात आली. दरम्यान, या मशिदीतील मुख्य हॉलचे नूतनीकरणाचे काम गेल्या तीन ते चार महिन्यांपासून सुरू होते, अशी माहिती परिसरातील नागरिकांनी दिली आहे.

यावेळी मशिदीचे मुख्य इमाम मुफ्ती नजमुद्दीन जिलानी व इतर उलेमा यांच्यासह मोहल्यातील नागरिक, तसेच परिसरातील शेकडो मुस्लिम बांधव उपस्थित होते.

## भ्रमर शब्दकोडे क्र. ३८६

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | ■ | ३ | ■ | ४ | ५ |
| | ■ | ■ | | ■ | ६ | | ७ | ■ | |
| | ■ | ८ | | | ■ | ९ | | | ■ |
| | ■ | | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | १० |
| ■ | ११ | ■ | १२ | | | ■ | १३ | ■ | |
| १४ | | ■ | | ■ | ■ | ■ | १५ | | |
| | ■ | १६ | | १७ | ■ | १८ | | ■ | ■ |
| ■ | १९ | | ■ | २० | | ■ | २१ | | २२ |
| ■ | ■ | | ■ | | ■ | २३ | ■ | ■ | |
| २४ | | | ■ | ■ | २५ | | | ■ | ■ |

**उभे शब्द :** १) सवंगड्यांच्या साथीने श्रीकृष्णाने करंगळीवर उचललेला पर्वत २) श्रीकृष्णाने बालपणी या उन्मत्त सर्पाचे मर्दन केले ३) श्रीकृष्णाचे वडील ५) वायू, पवन ७) रांग, वर उलट लिहा ८) गवळणी यामधून दही दूध विक्रीस नेत असत १०) युध्द, उन्हाळा (इंग्रजीत) ११) श्रीकृष्णाचा कपटी मामा १२) श्रीकृष्णाचे गोकुळात संगोपन करणारी माता १३) श्रीकृष्णाचा बंधू १४) नृप, भूपती, एक म्हण-यथा ** तथा प्रजा १६) श्रीकृष्णाच्या हातातील चक्र १७) श्रीकृष्णाकडे पुतना राक्षसीण हिचे रूप घेवून आली होती, आईची बहीण २२) श्रीकृष्णाच्या जोडीने हिचे नाव घेतले जाते २३) देवतांनी दिलेला आशिर्वाद

**आडवे शब्द :** १) गोकुळात असताना श्रीकृष्णाने व सर्व बालगोपाळांनी त्यांच्या शिदोऱ्यांचे एकत्र केलेले मिश्रण २) श्रीकृष्णाच्या हातातील बासरी ६) दैत्य, दानव ८) विविध रूपे घेणारा कपटी या अर्थाने राक्षस, फसवी आभासी शक्ती ९) श्रीकृष्णाची आई १२) गोकुळ या नदीकाठी वसले होते १४) धान्याचा ढीग, बालगोपाळांचा खेळ-**क्रीडा १५) दगडाचे तुकडे एकावर एक ठेवून ते उडविण्याचा बालगोपाळांचा खेळ १६) श्रीकृष्णाला पोहे देणारा परममित्र १८) श्रीकृष्णाची भक्त असलेली स्त्री संत १९) गोकुळाचा राजा २०) जंगल, अरण्य २१) कंसाची नगरी २४) श्रीकृष्णाचा परमशिष्य, पार्थ २५ ) रथ हाकणारा

### शब्दकोडे क्र. ३८५ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | म | दा | र | ■ | पा | र्थ | प | वा | र |
| दि | ■ | दा | ■ | ■ | टी | ■ | रे | ■ | ■ |
| त्य | ■ | ■ | रा | हु | ल | ■ | श | र | द |
| ठा | ■ | बी | ■ | ■ | ■ | ना | रा | य | ण |
| क | रा | ड | ■ | मे | ■ | ■ | व | ■ | द |
| रे | ■ | ■ | मौ | ■ | रा | फे | ल | ■ | णी |
| ■ | ब | ब | न | रा | व | ■ | ■ | ज | त |
| ■ | च्चू | ■ | ■ | म | सा | ■ | मा | ळ | ■ |
| ■ | क | पि | ल | ■ | हे | ■ | ■ | गा | ■ |
| झा | डू | ■ | क | री | ब | ■ | मा | व | ळ |

## 'बायको पाहिजे'चं पोस्टर, सोशल मीडियावर धुमाकूळ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** व्हायरल पोस्टर बॉय नेमका आहे कोण? प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला. सोशल मीडियावर सध्या एक वेगळाच चेहरा प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे.




हातात बायको पाहिजे असे पोस्टर्स घेऊन उन्हातान्हात फिरणारा हा तरुण सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. या तरुणाचे नाव आहे धनराज धोंडीराज दांगट. धनराजवर अशी वेळ का आली? बायको शोधण्यासाठी तो इतका वणवण का भटकतो आहे? आणि हा सगळा प्रयत्न नेमका कशासाठी? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे लवकरच प्रेक्षकांना मिळणार आहेत. मुंबईतील बस स्टॉप, रेल्वे स्टेशन जेथे जेथे शक्य आहे, तेथे तेथे जाऊन धनराजने आपल्या आयुष्याचा साथीदार मिळविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत.

त्याचा हा हटके आणि धाडसी प्रयत्न सध्या सोशल मीडियावर चांगलाच चर्चेत असून, अनेकांच्या कुतूहलाला कारणीभूत ठरत आहे. आता या सगळ्या प्रयत्नांना यश मिळते का? धनराजला त्याची अपेक्षित बायको सापडते का? की त्याच्या शोधाची गोष्ट आणखी वेगळे वळण घेते? हे सगळे पाहणे नक्कीच उत्सुकतेचे ठरणार आहे.



## वैभव वाघ यांना सी. ए. परीक्षेत यश

**देवळा (भ्रमर वार्ताहर) :-** सनदी लेखापाल (सीए) परीक्षेचा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला असून, त्यात नवी बेज गावातील दिलीप वाघ (गुरुजी) यांचे चिरंजीव व तालुक्यातील खर्डे येथील प्रगतिशील शेतकरी दत्तात्रेय देवरे यांचा नातू कु. वैभव वाघ याने उल्लेखनीय यश पटकावले. अभ्यासातील सातत्य, जिद्द व चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील वैभवने सीएच्या अंतिम वर्षात यशाला गवसणी घातल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

त्याच्या या यशाबद्दल खर्डे येथील छत्रपती पतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक सुखदेव देवरे यांनी केले.

या कार्यक्रमाप्रसंगी संस्थापक संदीप पवार, चेअरमन दत्तात्रेय देवरे, व्हाईस चेअरमन बबन गांगुर्डे, संचालक सुनील शिंदे आदींसह माजी उपसरपंच सुनील जाधव, किसन आप्पा मोरे, भाऊसाहेब मोरे, जितेंद्र पवार, आबा कुवर, कारभारी जाधव, प्रवीण देवरे, शशी ठाकरे, आबा पवार, पोलीसपाटील भारत जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

## जिल्हा परिषद नाशिकअंतर्गत 'आरोग्य सेवक' पदांचे नियुक्ती आदेश निर्गमित




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** जिल्हा परिषद नाशिकअंतर्गत रिक्त असलेली १४ आरोग्य सेवक (पुरुष) संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून, निवड झालेल्या उमेदवारांना मुख्य कार्यकारी अधिकारी ओम्कार पवार यांच्या हस्ते नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

गट 'क' संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी ऑगस्ट २०२३ मध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर दि. २ नोव्हेंबर २०२३ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल मे २०२४ मध्ये जाहीर करण्यात आला. त्या अनुषंगाने निवड प्रक्रियेची पुढील कार्यवाही पूर्ण करून पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. नियुक्त उमेदवारांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. रुजू होताना जिल्हा शल्यचिकित्सक, नाशिक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र, चारित्र्य प्रमाणपत्र, तसेच आवश्यकतेनुसार जातवैधता प्रमाणपत्र (सहा महिन्यांच्या आत) सादर करणे बंधनकारक राहील.

नवनियुक्त कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा राहणार असून, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी पदासाठी आवश्यक असलेले १२ महिन्यांचे मूलभूत प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणे अनिवार्य राहील.

जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या मान्यतेने ही निवड यादी अंतिम करण्यात आली असून, या नियुक्त्यांमुळे ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेला अधिक बळकटी मिळणार असल्याची माहिती जिल्हा परिषद प्रशासनामार्फत देण्यात आली आहे.

# नाशिकमधील रंगोत्सवाची क्षणचित्र...









शनि चौक येथील रहाडमध्ये डुबकी घेताना मंत्री गिरीश महाजन.





रोकडोबा मित्रमंडळ आयोजित रंगपंचमी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी झालेले नाशिककर. (छाया : अथर्व निरंतर)

# श्रीमती कल्याणी पुरस्कार भारती ठाकूर यांना प्रदान



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- पुस्तकी ज्ञानाच्या जोडीला व्यावहारिक ज्ञानदेखील महत्त्वाचे असून त्याकरिता विद्यार्थ्यांच्या कलेने त्यांना शिकवीत व्यवहार शिक्षण महत्त्वाचे कसे यावर भर देत यांच्या आवडी-निवडीतून विद्यार्थ्यांना आमच्या शाळेत प्रशिक्षित केले जात आहे. मूठभर विद्यार्थी असलेली ही शाळा आज १८०० विद्यार्थ्यांची झाली असून येथील सर्वच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा आहे, असे मत स्वामी विशुद्धानंद भारती (भारतीताई ठाकूर) यांनी व्यक्त केले.

कल्याणी महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने माधवी बुरकुले स्मरणार्थ श्रीमती कल्याणी द्वैवार्षिक पुरस्कार वितरण सोहळा गंगापूर रोड येथील मराठा विद्याप्रसारक शिक्षण संस्थेच्या आयएमआरटी कॉलेजच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. समाजातील प्रश्न जाणून ते सोडविणे व त्याद्वारे परिवर्तन व्हावे, या हेतूने काम करणाऱ्या संस्था किंवा व्यक्तींचा सत्कार श्रीमती कल्याणी पुरस्काराने केला जातो. यावर्षीचा हा पुरस्कार नाशिक कन्या व नर्मदालयाच्या संस्थापिका भारती ठाकूर उर्फ साध्वी विशुद्धानंदा भारती यांना त्यांनी केलेल्या विस्थापितांसाठीच्या कार्याबद्दल प्रदान करण्यात आला. स्मृतिचिन्ह रोप व रोख ११ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते.

यावेळी प्रमुख अतिथी नगरसेवक सुरेश पाटील, दैनिक भ्रमरचे संपादक चंदुलाल शाह, डॉ. शरद महाले यांच्या हस्ते भारती ठाकूर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलताना भारती ठाकूर पुढे म्हणाल्या की, नर्मदा परिक्रमा करण्यास निघाली असताना तेथील एका आदिवासी गावात काम करीत असलेल्या मुलांना बघून विचारणा केली. तेव्हा सातवी-आठवीत शिक्षण घेत असलेल्या या मुलांना अक्षरओळखदेखील नव्हती. सरकारने आठवीपर्यंत विद्यार्थ्याला नापास करण्यास मज्जाव केल्याने वरच्या वर्गात ढकलल्यामुळे त्यांची ही परिस्थिती होती.

ही गोष्ट त्यावेळी मनाला खटकल्यानंतर अचानक नाशिकमधून तिकडे जाण्याचा निर्णय घेतला. मोजक्या मुलांनाच शिकवत असताना परमेश्वरानेच यश दिले आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली. त्यांच्या कलेने शिक्षण देत पुस्तकाबरोबरच व्यवहार ज्ञान शिकवीत हे सर्व विद्यार्थी आज या नर्मदालयातील खाण्यापिण्यापासून सर्व कामे स्वतः करतात. या शाळेतील सर्व फर्निचर या विद्यार्थ्यांनी स्वतः बनविलेले आहे. एवढेच नव्हे तर या ठिकाणी असलेल्या गायींचे संगोपन व त्यांचे बाळंतपणदेखील हे विद्यार्थीच करतात.

पंधरा ते वीस गावांतील सुमारे १८०० विद्यार्थी आज या नर्मदालयात असून मुलांना व्यावहारिक शिक्षण देताना इतिहास कोणता शिकवायचा हे आम्ही ठरवतो. विज्ञान काय हे आम्ही ठरवतो. या मुलांचे पाढे पाठ नसतील, मात्र सर्व स्तोत्रे, भगवद्गीता तोंडपाठ आहे. या सर्व विद्यार्थ्यांना आता उत्तम संस्कृत येते. रोजच्या अनुभवातून घडत असलेल्या विद्यार्थ्यांनी शास्त्रीय संगीताच्या चार परीक्षा पूर्ण केल्या आहेत. पाठ्यपुस्तकातील कवितांना चाली लावून त्या तोंडपाठ केल्या आहेत. पाढे म्हणताना शास्त्रीय संगीताचा आधार घेऊन शिकत आहेत. या जीवन शिक्षणालाच आमच्या नर्मदालयात अधिक महत्त्व असल्याचे त्या म्हणाल्या. ॲड. स्वरा देशमुख यांच्या गणेशवंदना नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नगरसेवक गुरमित बग्गा, डॉ. हेमलता पाटील त्याचबरोबर व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. ज्योती सोनवणे यांनी स्वागत केले. कल्याणी नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा ॲड. अंजली पाटील यांनी प्रास्ताविकात पतसंस्था व त्यांच्या अंगीकृत संस्थांविषयी माहिती दिली. स्नेहल सारंग यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. त्यानंतर नूतन नगरसेविका दीपाली गिते, मोनिका हिरे, सरिता सोनवणे, कविता लोखंडे, सुप्रिया खोडे, आदिती पांडे, वैशाली दळवी, सीमा ठाकरे, रंजना भानसी, कमलेश बोडके, प्रमोद पालवे, तसेच स्नेहल सारंग, सुवर्णा दाबक त्याचबरोबर दैनिक भ्रमरचे संपादक चंदुलाल शाह, डॉ. शरद महाले, सुरेश पाटील आदींचा सत्कार करण्यात आला.

सुप्रिया खोडे व शैलजा ब्राह्मणकर यांनी सत्काराला उत्तर देताना आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी कल्याणी पतसंस्थेच्या विविध कार्याबद्दलची माहिती दर्शविणारी, तसेच भारती ठाकूर यांच्या नर्मदालयावर आधारित चित्रफिती दाखविण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी दीक्षित यांनी केले. आभार प्रतिभा महाले यांनी मानले. पुरस्कर वितरण सोहळ्यासाठी शहर परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिकरोडला अल्पवयीन मुलीला निर्जनस्थळी नेऊन अत्याचार

## इन्स्टाग्रामवरील ओळखीचा शेवट धक्कादायक

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी)**:- लग्नाचे आमिष दाखवून आणि जीवे मारण्याची धमकी देऊन एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना नाशिकरोड परिसरात उघडकीस आली आहे.

याप्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात परश्या जाधव आणि त्याच्या एका अनोळखी साथीदाराविरुद्ध पोक्सोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी अटकेची कारवाई केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी शहरातील एका नामवंत शाळेत इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेत आहे. सुमारे दोन-अडीच महिन्यांपूर्वी सोशल मीडियावरील आयडीवरून संशयित परश्या जाधव याने पीडितेशी ओळख वाढवली होती. त्याने तिला लग्नाचे आमिष दाखवून सातत्याने भेटण्यासाठी बोलावले होते. मात्र, घरच्यांच्या भीतीपोटी ती त्याला भेटण्यास टाळत होती.

दि. ४ मार्च रोजी सकाळी संशयित परश्या याने पीडितेच्या मोबाईलवर फोन करून तिला नाशिकरोड बसस्थानक येथे भेटण्यास बोलावले. 'जर भेटायला आली नाही तर तुला मारून टाकेन', अशी धमकी त्याने दिल्याने पीडिता घाबरली आणि बसस्थानकावर पोहोचली. तेथे संशयित परश्या आणि त्याचा २० ते २५ वयोगटातील एक साथीदार दुचाकीसह हजर होते.

संशयितांनी पीडितेला दुचाकीवर बसवून चेहडी गावाजवळील नदीकाठच्या निर्जन जंगलात नेले. तेथे दुपारी १ वाजेच्या सुमारास संशयित परश्याने पीडितेवर बळजबरीने अत्याचार केला. धक्कादायक बाब म्हणजे, यावेळी त्याच्यासोबत असलेल्या साथीदाराने पीडितेचे निर्वस्त्र अवस्थेतील फोटो आणि व्हिडिओ आपल्या मोबाईलमध्ये चित्रीत केले. या प्रकारानंतर संशयितांनी पीडितेला पुन्हा बसस्थानक परिसरात सोडून पळ काढला.

घटनेच्या दिवशी मुलगी बेपत्ता असल्याने पालकांनी तिचा शोध घेतला होता. त्यावेळी ती बसस्थानक परिसरात मिळून आली होती. मात्र घाबरलेल्या अवस्थेत असल्याने तिने काहीही सांगितले नाही. दि. ६ मार्च रोजी रात्री पीडितेच्या भावाने तिला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता तिने घडलेला सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर पालकांनी तातडीने नाशिकरोड पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून दोन्ही संशयित यांना ताब्यात घेतले आहे. अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उद्यापासून कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी शिबिर

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)**:- सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आणि जागतिक दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एसएमबीटी हॉस्पिटल व एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटतर्फे विशेष पुढाकार घेत उद्या (दि.१०) ते १५ मार्च यादरम्यान मोफत हृदयरोग तपासणी व जटिल अँजिओप्लास्टी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात लंडन येथे कार्यरत असलेले आंतराष्ट्रीय ख्यातीचे प्रसिद्ध इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. सुधीर राठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जटील अँजिओप्लास्टीसाठी मार्गदर्शन करणार असल्याची माहिती एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे संचालक व वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा यांनी दिली.

ते म्हणाले की, दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत हे शिबिर सुरु राहणार आहे. डॉ. राठोरे हे १३ व १४ मार्च रोजी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहून रुग्णांची जटिल अँजिओप्लास्टी करण्यासाठी मार्गदर्शन करतील. डॉ. राठोरे हे लंडन येथील एनएचएस हॉस्पिटल येथे कन्सलटंट इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांना मिळणार असल्यामुळे जास्तीत जास्त रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

या सात दिवसीय शिबिरामध्ये हृदयाच्या रक्तवाहिन्यांवरील ॲडव्हान्स कोरोनरी इंटरव्हेंशन उपलब्ध करून दिले जाणार आहेत. यामध्ये क्रॉनिक टोटल ऑक्लूजन अँजिओप्लास्टी, गुंतागुंतीची व जटिल अँजिओप्लास्टी, लेफ्ट मेन व बायफर्केशन अँजिओप्लास्टी, रोटेशनल अँथरेक्टॉमी, आयव्हस व रोटा ओसीटी यांसारख्या अत्याधुनिक इमेजिंग तंत्रज्ञानाचा वापर करून उपचार केले जाणार आहेत. तसेच हृदयविकाराचा धक्का बसलेल्या रुग्णांसाठी तातडीची अँजिओप्लास्टी करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यासोबतच छातीत दुखणे, जळजळ होणे, चालताना दम लागणे किंवा अचानक दरदरून घाम येणे यांसारखी लक्षणे आढळल्यास ती हृदयविकाराची असू शकतात. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष न करता नागरिकांनी या शिबिरात मोफत आपली तपासणी करून घ्यावी, असे आवाहन रुग्णालयाचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांनी केले. विशेष म्हणजे, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र असणाऱ्या रुग्णांना या शिबिरात मोफत उपचार व शस्त्रक्रियेची सुविधा दिली जाणार असल्याचे बोरसे यांनी सांगितले. यासोबतच या शिबिराच्या अधिक माहितीसाठी हृदयविकार विभागाच्या ७७४४९१३९१३ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत असलेली साधनसामुग्री आणि सुसज्ज क्रिटीकल केअर विभाग यामुळे मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणी होत असलेल्या क्लिष्ट शस्त्रक्रिया, प्रक्रिया एसएमबीटीत करणे शक्य झाले आहे. अशा प्रकारच्या कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी करण्यासाठी वेगळ्या प्रकारचे कौशल्य अवगत असणे गरजेचे असते. हे कौशल्य येथील तज्ज्ञांकडे असल्यामुळे गेल्या काही वर्षांत याठिकाणी फादर ऑफ कार्डीओलॉजीस्ट डॉ. सॅम्युअल मॅथ्युज, दिवंगत सीव्हीटीएस सर्जन डॉ. एस. एस. भट्टाचार्य, बाल हृदयविकार तज्ज्ञ डॉ. गुयेन लॅन ह्यू, प्रसिद्ध तावी कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी तज्ज्ञ डॉ. यान कोवाक यांनीही याठिकाणी उपस्थित राहून हृदयविकार शस्त्रक्रिया केल्या आहेत.

### लंडनचे तज्ज्ञ एसएमबीटीत

हृदयविकाराच्या उपचारांमध्ये तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. अनेकदा रक्तवाहिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कॅल्शियम साचलेले असते किंवा त्या पूर्णपणे बंद झालेल्या असतात. अशा जटिल केसेसमध्ये सामान्य अँजिओप्लास्टी यशस्वी होत नाही, तिथे अद्ययावत तंत्रज्ञानाची गरज असते. एसएमबीटीमध्ये आम्ही जागतिक दर्जाची ही सेवा ग्रामीण आणि गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवत आहोत. डॉ. सुधीर राठोरे यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या अनुभवामुळे आणि कौशल्यामुळे आपल्या भागातील रुग्णांना लंडनसारख्या शहरात मिळणारे उपचार मार्गदर्शन एसएमबीटीत उपलब्ध होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे संचालक व वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा यांनी केले.

### हे शिबिर कोणासाठी उपयुक्त?

ज्या रुग्णांना हृदयाच्या रक्तवाहिन्यांतील ब्लॉकेजमुळे बायपास शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला आहे, परंतु बायपास करणे धोकादायक ठरू शकते किंवा ज्यांना बायपासची भीती वाटते, अशा रुग्णांसाठी हे शिबिर विशेष उपयुक्त आहे. कॅल्शियम साचल्यामुळे कडक झालेल्या रक्तवाहिन्या, रोटा, आयव्हस यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अँजिओप्लास्टी करण्याचा सल्ला दिलेले रुग्ण तसेच ज्या रुग्णांच्या धमनीतील ब्लॉकेज कठीण किंवा गुंतागुंतीच्या ठिकाणी आहे आणि ज्यासाठी तज्ज्ञ हृदयविकार तज्ज्ञांची आवश्यकता असते, अशा रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा.

# भद्रकाली परिसरात पाच टपऱ्यांना आग



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- भद्रकाली परिसरातील टपऱ्यांना शनिवारी मध्यरात्री ३.३० वाजेच्या दरम्यान अचानक आग लागली. घटनास्थळी अग्निशामक दलाच्या जवानांना तातडीने कळविण्यात आल्याने त्यांनी वेळेत येऊन ही आग आटोक्यात आणली.

टपऱ्यांना आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे कर्मचारी तत्काळ घटनास्थळी उपस्थित झाले. पाच टपऱ्यांना आग लागली होती. या टपऱ्यांमध्ये हातगाड्या होत्या. त्याचबरोबर लहान मुलांचे फुटवेअरचे साहित्य, दिवाळीचे साहित्य, अंत्यविधीचे साहित्य, कांदे, बटाटे, लसूण व इतर साहित्यदेखील होते. हे सर्व साहित्य आगीत जळून खाक झाले. टपरीमालक विजय बोरकर यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. ही आग विझविण्यासाठी मनपा अग्निशमन दलाचे वाहनचालक एम. डी. कदम, इसाक शेख, आर. सी. मोरे, सोमनाथ थोरात, ट्रेनी फर्मर मंगेश जाधव, प्रथमेश वाघ, प्रशांत इंद्राळकेव बी. पी. शिंदे यांनी परिश्रम घेतले. यावेळी भद्रकालीचे पोलीस उपस्थित होते.

# त्र्यंबकला अलोट उत्साहात रंगपंचमी साजरी

## विविध रंगांची उधळण करीत तरुणाईचा आनंदोत्सव



**त्र्यंबकेश्वर (सतीश दशपुत्रे)** :- येथे रंगपंचमी उत्साहात साजरी झाली. सकाळपासून रंग खेळण्यास प्रारंभ झाला होता. बाळगोपाळांनी सकाळपासून विविध रंगांची उधळण करीत रंगपंचमी साजरी केली. दुपारनंतर चौकाचौकात डीजे वाजवत रंग खेळण्यात येत होते. पर्यावरणपूरक रंग वापरण्यात आले.

चौकाचौकात असलेल्या होळ्या पुन्हा पेटवण्यात येऊन नैवेद्य दाखवत होळीची सांगता झाली.

नगरपालिका प्रशासनाने शहरातील तलाव रासायनिक रंगाने दूषित होणार नाहीत, याची काळजी घेण्याचे जाहीर आवाहन केले.त्यास नागरिकांनी देखील चांगला प्रतिसाद दिलेला आढळून आला आहे.रंग खेळताना बाहेरगावचे भाविक, यात्रेकरू व ज्येष्ठ नागरिक यांना त्रास होणार नाही, याची काळजी घेतली जात होती. युवकांचा उत्साह अमाप होता. तशात मंगल वाद्य वाजवत काही ठिकाणी पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन करीत साधेपणाने रंगपंचमी साजरी करण्यात आली. शहरातील बहुतांश व्यावसायिकांनी आपले व्यवसाय बंद ठेवले होते. कष्टकरी कामगारांना रंगपंचमी सणाच्या निमित्ताने विश्रांती मिळाली. आखाड्यातील साधूंनीदेखील रंगपंचमी साजरी करीत आनंद व्यक्त केला आहे.

## आजचा वाढदिवस



सतीश कुलकर्णी
माजी महापौर

## बाळांचे वाढदिवस



समीर अनमोला



क्रिश बंब

# क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे जळगावमध्ये प्रॉपर्टी एक्स्पोचे ना. महाजन यांच्या हस्ते उद्घाटन




**जळगाव (भ्रमर वृत्तसेवा)** :- क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे जळगावमध्ये प्रॉपर्टी एक्स्पोचे शानदार उद्घाटन वातानुकूलित डोममध्ये जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महापौर दीपमाला काळे, आ. राजूमामा भोळे, नितीन लड्ढा, सुनील झवर, क्रेडाई राज्य उपाध्यक्ष अनिश शहा, क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष गौरव ठक्कर, मानद सचिव तुषार संकलेचा, उपाध्यक्ष व प्रॉपर्टी एक्स्पो हेड मनोज खिंवसरा, उपाध्यक्ष अनिल आहेर, समन्वयक सागर शहा, सहसमन्वयक अनंत ठाकरे, आयपीपी कृणाल पाटील, माजी अध्यक्ष उमेश वानखेडे, सतीश मोरे, ऋषभ जैन, सुशील बागड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी गिरीश महाजन यांनी सर्वांना शुभेच्छा देऊन मी पण नाशिककरच आहे, असा उल्लेख केला व येणाऱ्या काळात नाशिकचे योगदान विशद केले. नाशिकला होणाऱ्या महकुंभाचा उल्लेख करताना तेथील विकासात्मक कामांचा आढावा घेतला. त्यामुळे क्रेडाई नाशिक मेट्रोचे हे प्रदर्शन जळगावसाठी किती महत्त्वाचे आहे व याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी एक्स्पो समन्वयक सागर शाह यांनी प्रास्ताविक केले. तुषार संकलेचा यांनी आभार मानले. महापौर दीपमाला काळे व आ. राजूमामा भोळे यांनीदेखील मार्गदर्शन केले.

नाशिक हे महाराष्ट्रातील एक अग्रगण्य प्रगतिशील शहर म्हणून ओळखले जाते. औद्योगिक, शैक्षणिक, आरोग्य, तसेच कृषी यावर आधारित अनेक उद्योग संधी नाशिकमध्ये उपलब्ध आहेत. याच नाशिकमध्ये रिअल इस्टेट क्षेत्रातील गुंतवणुकीच्या अपरिमित संधी आहेत. या संधींची माहिती एकाच छताखाली मिळावी यासाठी बांधकाम व्यावसायिकांची देशातील सर्वांत मोठी संस्था क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे जळगावमधील सागर पार्क ग्राउंड येथे नाशिक प्रॉपर्टी एक्स्पो या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष गौरव ठक्कर यांनी यावेळी दिली.

ते पुढे म्हणाले, की हवेची गुणवत्ता व पाण्याची मुबलकता याचे वरदान लाभलेल्या नाशिकमधील हवामान अनेकांना आकर्षित करते. तसेच मुंबई-पुण्यापासून कमी अंतर आणि जगभरातील सर्व प्रमुख शहरांसोबत वाढलेली कनेक्टिव्हिटी यामुळे नाशिकमधील रिअल इस्टेटमधील गुंतवणूक ही भविष्यात लाभदायी ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. चेन्नई- सुरत महामार्ग, नाशिकजवळ विकसित होत असलेले वाढवण बंदर यासोबतच नुकत्याच समृद्धी महामार्ग हा खान्देश एक्स्प्रेसवेद्वारे जळगावला सहा पदरी रस्त्याने जोडण्याच्या घोषणेमुळे जळगाव आणि नाशिकची कनेक्टिव्हिटी वाढणार असून प्रवासाचा वेळ वाचणार आहे.

सुमारे २८ वर्षांपासून कार्यरत क्रेडाई ही राष्ट्रीयस्तरावरील बांधकाम व्यावसायिकांची सर्वांत मोठी संस्था असून, आजमितीला देशातील २३० शहरांतील १३000 हून अधिक बांधकाम व्यावसायिक या संस्थेसोबत जोडले आहेत.

जळगाव येथे आयोजित या प्रदर्शनात नाशिकचे अनेक आघाडीचे विकसक सहभागी होणार असून फ्लॅट्स, प्लॉट्स, फार्म हाऊस, शॉप्स, ऑफिसेस यांचे असंख्य पर्याय येथे उपलब्ध असतील. प्रदर्शनाचा लेआउट व व्यवस्था आंतरराष्ट्रीयस्तराला साजेशी असून, ग्राहकांच्या सोयीसाठी पूर्ण प्रदर्शन वातानुकूलित असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रदर्शनाचे सहसमन्वयक अनंत ठाकरे म्हणाले, नाशिकमध्ये होत असलेल्या कुंभमेळ्यामुळे लाखो भाविक आगामी दीड वर्षाच्या कालावधीत येणार आहेत. यामुळे रिअल इस्टेट क्षेत्रातील गुंतवणुकीला परतावा मिळण्याची शक्यता अधिक आहे. यासोबतच विविध क्षेत्रांतील उपलब्ध संधीमुळेदेखील भविष्यातील गुंतवणूक म्हणजे नाशिक रिअल इस्टेट क्षेत्रातील गुंतवणूक असे म्हणणे वावगे ठरणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

या तीनदिवसीय प्रॉपर्टी एक्स्पोमध्ये नाशिकसोबतच इगतपुरी, कसारा, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी या भागातील अनेक पर्याय उपलब्ध असून, प्रदर्शनाचे प्रायोजक म्हणून अर्बन साईट्स व सहप्रायोजक म्हणून क्रिश ग्रुप व ललित रुंगठा यांनी जबाबदारी स्वीकारली आहे.

प्रदर्शनाची वेळ सकाळी १0 ते रात्री ९ वाजेपर्यंत असून प्रदर्शनास अधिकाधिक जणांनी भेट द्यावी, असे आवाहन क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे करण्यात आले आहे .


प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी उपाध्यक्ष उदय घुगे, अंजन भालोदिया, कोषाध्यक्ष श्रेणिक सुराणा, सहसचिव नरेंद्र कुलकर्णी, सचिन बागड, हंसराज देशमुख, ऋषिकेश कोते, मॅनेजिंग कमिटी सदस्य श्यामकुमार साबळे, विजय चव्हाणके, निशित अटल, सुशील बागड, निरंजन शाह, वृषाली हिरे, दीपाली बिरारी, सहयोगी सदस्य सुशांत गांगुर्डे, अभिषेक महाजन, समीर सोनवणे, मनोज लाडानी, हर्षल हणमंते, भूषण कोठावदे, शिवम् पटेल, हिरेन भडजा, मयुरेश चौधरी, ऋषभ तोडरवाल, क्रेडाई युवा विंग समन्वयक आदित्य भातंबरेकर, सहसमन्वयक अजिंक्य नहार यांचे विशेष सहकार्य लाभले, तसेच क्रेडाई जळगावचे अध्यक्ष दीपक सराफ, सचिव तुषार महाजन यांचेही सहकार्य लाभले.

# ना. गिरीश महाजनांनी महिलादिनी मन जिंकले, खऱ्या अर्थाने संकटमोचक शोभले

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- सकाळच्या सुमारास मंत्री महाजन हे जळगाव येथून रेल्वेने नाशिकला पोहोचले. नाशिक रेल्वे स्थानकावरून ते शहरात येत होते. त्याचवेळी उपनगर सिग्नलजवळ एक महिला गाडी चालवत असताना चक्कर आल्याने ती रस्त्यावर पडली होती. आसपासचे नागरिक तेथे जमा झाले होते. त्यावेळी मंत्री महाजन यांच्या वाहनाचा ताफा तेथून जात होता. महाजन यांनी ते दृश्य पाहताच तत्काळ आपला ताफा थांबविला आणि स्वत: त्या महिलेजवळ जाऊन तिची आपुलकीने विचारपूस केली.

यावेळी त्यांनी लागलीच उपस्थितांना मदतीचे आवाहन करीत आपल्याच वाहनातून पाण्याची बाटली मागवीत महिलेला पाणीदेखील दिले. यानंतर त्या महिलेला रुग्णालयात नेण्याबाबत उपस्थितांना सूचना केली; मात्र किरकोळ जखम झाल्याचे महिलेने सांगितले. महाजन यांच्या या तत्परतेमुळे महिलेला दिलासा मिळाला असून, नागरिकांनीदेखील मंत्री महाजन यांच्या भूमिकेचे स्वागत केले.

# येवल्यात पत्नीच्या प्रसूतीसाठी साठवलेल्या रकमेची चोरी



**येवला (दीपक सोनवणे)** :- पत्नीची प्रसूतीच्यावेळी आर्थिक अडचण भासू नये म्हणून जमवून ठेवलेली रोकड अज्ञात चोरट्याने घरफोडी करुन चोरुन नेल्याची घटना येवल्यात घडली.

शहरातील नांदगाव बायपास परिसरात असलेल्या रमण पार्क सोसायटीत ही खळबळजनक घटना घडली आहे. या सोसायटीतील रहिवासी रवी पवार यांच्या घरात भरदिवसा घरफोडी झाली. विशेष म्हणजे, ज्यावेळी ही चोरी झाली, त्यावेळी पवार कुटुंब घरी नव्हते. पवार यांच्या पत्नीची डिलिव्हरी जवळ असल्याने, त्यांनी दवाखान्याच्या खर्चासाठी घरात रोख रक्कम साठवून ठेवली होती. घटनेच्या दिवशी रवी पवार हे आपल्या पत्नीला घेऊन दवाखान्यात गेले होते.

घर बंद असल्याची आणि घरात कोणीही नसल्याची संधी साधत चोरट्याने दुपारच्या सुमारास डाव साधला. चोरट्याने दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला आणि कपाटातील रोख रक्कम घेऊन पोबारा केला. पवार कुटुंब दवाखान्यातून परतले, तेव्हा त्यांना घराचा दरवाजा उघडा दिसला आणि आत सामान अस्तव्यस्त झालेले आढळले. मेहनतीचे आणि गरजेच्या वेळी कामाला येणारे पैसे चोरीला गेल्याने पवार कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे. शहरात चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली असून, भरदिवसा घरफोडी झाल्याने रमण पार्क परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करावा आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांच्या मुसक्या लवकरात लवकर आवळाव्यात, अशी मागणी येवला शहरातील नागरिक करीत आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह * पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. * Editor : Chandulal Shah * Executive Editor : Hitesh Chandulal Shah.